बुधवार, 25 मे 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 265
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 25 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-265 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### लाच मागितल्याप्रकरणी आरोग्यमंत्र्यांना अटक



आधुनिक केसरी न्यूज

**चंदीगड :** भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे पंजाबमधील वातावरण ढवळून निघाले आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आप सरकारमधील आरोग्यमंत्री डॉ. विजय सिंगला यांची भ्रष्टाचाराच्या आरोपावरून हकालपट्टी केली आहे. पंजाब पोलिसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेकडून त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आल्याची माहिती आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पंजाबचे आरोग्यमंत्री असताना विजय सिंगला यांनी २३ मार्च रोजी भ्रष्टाचार खपवून घेणार नसल्याची घोषणा केली होती. इतकेच नाहीतर भ्रष्टाचाऱ्यांवर शून्य सहनशीलता दाखवली जाणार असा दावाही त्यांनी केला होता. त्यांच्या या विधानानंतर अगदी ६२ दिवसांनी म्हणजेच २४ मे रोजीच ते भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकले. भगवंत मान यांच्या सरकारचे हे अत्यंत मोठे आणि धाडसी पाऊल असल्याची सध्या चर्चा सुरू आहे.

# श्रीरामाशी तुमचे वैर काय ?

## हार्दिक पटेल यांचा काँग्रेसला सवाल



आधुनिक केसरी न्यूज

**गांधीनगर : नुकतेच काँग्रेस पक्ष सोडलेल्या पाटीदार समाजाचे नेते हार्दिक पटेल यांनी मंगळवारी काँग्रेसवर गंभीर आरोप केले. काँग्रेस पक्ष लोकांच्या भावना दुखावतो आणि हिंदू धर्माच्या श्रद्धेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न करतो, असे हार्दिक पटेल यांनी म्हटले आहे. गुजरात काँग्रेसच्या एका नेत्याच्या वक्तव्यावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.**

मी यापूर्वीही म्हटले होते की, काँग्रेस पक्ष जनतेच्या भावना दुखावण्याचे काम करतो, हिंदू धर्माच्या श्रद्धेला तडा देण्याचा प्रयत्न करतो. आज माजी केंद्रीय मंत्री आणि गुजरात काँग्रेसच्या नेत्याने राम मंदिराच्या विटांवर कुत्रे लघवी करतात असे विधान केले! मला काँग्रेस आणि त्यांच्या नेत्यांना विचारायचे आहे की, भगवान श्रीरामाशी तुमचे काय वैर आहे? तुम्ही हिंदूंचा इतका द्वेष का करता? शतकांनंतर अयोध्येत भगवान श्रीरामाचे मंदिर बांधले जात आहे, तरीही काँग्रेसचे नेते प्रभू श्रीरामाच्या विरोधात वक्तव्ये करत आहेत, असे हार्दिक पटेल यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

हार्दिक पटेल यांनी १८ मे रोजी काँग्रेस पक्षाच्या पदाचा आणि प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. हार्दिक पटेल काँग्रेसमधून बाहेर पडणार असल्याचे संकेत गेल्या काही महिन्यांपासून मिळत होते. प्रदेश काँग्रेस नेत्यांवर जाहीर नाराजी व्यक्त करताना हार्दीक यांनी पक्षाच्या वरिष्ठ



नेतृत्वाबाबत ममत्व बाळगले होते. मात्र, त्यांनी काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांना पाठवलेल्या राजीनामा पत्रात प्रदेश काँग्रेस नेत्यांबरोबरच शीर्ष नेतृत्वालाही लक्ष्य केले. काँग्रेस पक्ष केवळ निषेधाच्या राजकारणापुरता मर्यादित राहिला आहे, तर देशातील जनतेला विरोध नाही तर त्यांच्या भविष्याचा विचार करणारा आणि देशाला पुढे नेण्याची क्षमता असलेला पर्याय हवा आहे. अयोध्येतील राम मंदिर असो, सीएए-एनआरसीचा मुद्दा असो, जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवणे असो किंवा जीएसटी लागू करणे असो, देशाला दीर्घकाळापासून यावर तोडगा हवा होता. मात्र, काँग्रेसने यात केवळ अडथळा म्हणून काम केले. काँग्रेसची भूमिका केवळ केंद्राला विरोध करण्यापुरती मर्यादित होती, असे हार्दिक पटेल यांनी आपला राजीनामा देताना म्हटले होते.

## चर्चेतली बातमी

### निवृत्ती महाराज इंदुरीकर यांची प्रकृती बिघडली



आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** प्रसिद्ध किर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांची प्रकृती बिघडली असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे ३० मे पर्यंतचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांना डॉक्टरांनी सक्तीची विश्रांती घेण्यास सांगितले आहे. दरम्यान, निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी यासंदर्भात एक पत्र लिहून लवकरच बरा होऊन मी आपणा सर्वांच्या सेवेत येणार आहे आपल्या सर्वांचे आशीर्वाद माझ्या मागे आहेत असे म्हटले आहे. ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख प्रकृती अस्वस्थाच्या कारणास्तव डॉक्टरांनी सक्तीची विश्रांती सांगितल्यामुळे दि.२३ ते दि.३० मेंपर्यंतचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे. इच्छा असूनही कार्यक्रमास येऊ शकत नाही. त्यामुळे कार्यक्रमांच्या संयोजकांची, आयोजकांची गैरसोय होत आहे. त्याबद्दल मनापासून दिलगीर आहोत. उपचारानंतर पुन्हा आपल्या सेवेत पूर्व नियोजित कार्यक्रम पार पडतील.

# मध्य प्रदेशने आरक्षण कसे टिकवले ते पाहा, राज्य सरकारच्या मदतीला तयार : पंकजा मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मध्यप्रदेश सरकारने ज्या प्रकारे ओबीसी आरक्षण टिकवून दाखवले, त्याप्रमाणे राज्य सरकारनेही पावले उचलावी. काही मदत लागल्यास मी स्वतः मध्यप्रदेशात जायला तयार आहे. मी लागेल ती मदत करेन, असे आवाहन भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी राज्य सरकारला केले आहे. तसेच, ओबीसी आरक्षण सुरक्षित करण्यासाठी ओबीसी नेते कमी पडत आहेत. ओबीसी आरक्षण टिकवून ठेवणारे लोक कमी पडत आहेत, असेही त्या म्हणाले. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होऊ नये असेच मला वाटते, मध्यप्रदेशचा निर्णय झाल्यानंतर मला असे वाटते की सकारात्मक दृष्ट्या हा निर्णय हाताळला गेला तर आपण मध्यप्रदेशच्या धर्तीवर हे आरक्षण चिकवून ठेवू शकतो, त्यामुळे सरकारने जर पावसाच्या कारणामुळे निवडणुका पुढे ढकलाव्या असे सांगितले असेल तर तो वेळ इम्पेरिकल डेटासाठी वापरावा आणि ओबीसी आरक्षण सुरक्षित करून द्यावे, असे त्या म्हणाल्या. राज्य सरकारने याकडे गांभीर्याने पाहिले नाही त्यामुळे ओबीसी आरक्षण आमच्या हातातून गेले, हा फार मोठा गुन्हा आहे. मी बोलले होते की ओबीसी आरक्षणाला धक्का नसून धोका आहे, अशी टीकाही पंकजा मुंडेंनी केली.

मध्यप्रदेशात त्यांनी ओबीसी आरक्षण कशापद्धतीने दिले हे



आपल्या राज्याने घ्यावे, अशी सूचना मी ऑलरेडी केली आहे. ही सूचना विधानसभेतही मांडली होती. ती स्वीकारली गेली होती. काही मदत लागली राज्य सरकारला तर नक्की करू, मी आवाहनही करते सरकारला की मध्यप्रदेशमध्ये जे काम झालं त्यात काही मदत हवी असेल तर तेही मी करायला तयार आहे, असे आवाहान त्यांनी ठाकरे सरकारला केले आहे.

**राज्य सरकारची मानसिकता नाही**

राज्य सरकारची मानसिकता ओबीसी आरक्षण टिकवून ठेवण्याची, सुरक्षित करण्याची नाही. कारण, त्यांना जे सुरक्षित करायचे असते ते करतातच. ओबीसी आरक्षण सुरक्षित करण्यासाठी ओबीसी नेते कमी पडत आहेत. ओबीसी आरक्षण टिकवून ठेवणारे लोक कमी पडत आहेत, असे म्हणत त्यांनी सरकारमधील ओबीसी नेत्यांना सुनावले आहे.

# कुतुबमिनारमध्ये पूजेचा अधिकार देता येणार नाही : पुरातत्व विभाग

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दिल्लीतील प्रसिद्ध कुतुबमिनार येथे पुजा करण्याची परवानगीची मागणी करणाऱ्या हिंदु पक्षाच्या याचिकेवर भारतीय पुरातत्व विभागाने जोरदार आक्षेप घेतला आहे. कुतुबमिनारची ओळख बदलता येणार नाही, असे पुरात्तव विभागाने कोर्टात दाखल केलेल्या आपल्या जबाबात म्हटले आहे.

दिल्लीतील साकेत कोर्टात कुतुबमिनार परिसरात हिंदू देवी-देवतांची पूजा करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी याचिका दाखल करण्यात आली होती. कुतुबमिनार परिसरात हिंदू देवी- देवतांच्या अनेक मूर्ती असल्याचा दावा या याचिकेत करण्यात आला आहे.

**पूजेचा अधिकार देता येणार नाही : एएसआय**

हिंदू पक्षकारांनी दाखल केलेल्या याचिकेवर भारतीय पुरातत्व विभागाने साकेत कोर्टात उत्तर दिले आहे. कुतुबमिनारला १९१४ मध्ये संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे कुतुबमिनारची ओळख आता बदलता येणार नाही. तसेच, पुजेचे अधिकारही देता येणार नाही, असे एएसआयने स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर, संरक्षित स्मारक म्हणून घोषणा केल्यानंतरही याठिकाणी कधी पूजा करण्यात आली नाही.

**‘कुतुबमिनार नव्हे, विष्णुस्तंभ’**

**युनायटेड हिंदू फ्रंटच्या वतीने आज कुतुबमिनार येथे हनुमान चालीसाचे पठण करण्यात आले. कुतुबमिनार हा मुळात विष्णुस्तंभ आहे. या मिनाराच्या बांधकामासाठी २७ जैन आणि हिंदू मंदिरांना जमीनदोस्त करण्यात आले, असा दावा या संघटनेने केला आहे. या परिसरातील देवी-देवतांच्या मूर्तींचा जीर्णोद्धार करण्यात यावा, अशी मागणी या संघटनेने केली आहे.**

हिंदू पक्षकारांच्या याचिका कायद्याला धरुन नाहीत. त्याचबरोबर प्राचीन मंदिरे तोडून कुतुब मिनार बांधल्याचा दावा इतिहासाशी संबंधित आहे.

त्यामुळे कुतुबमिनारमध्ये कोणालाही पुजा करण्याचा अधिकार नाही. जेव्हापासून संरक्षित स्मारक म्हणून त्याचे संरक्षण करण्या येत आहे तेव्हापासून तिथे कोणत्याही प्रकारची पूजा करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत पुजेसाठी परवानगी देता येणार नाही, असे पुरात्तत्व विभागाने म्हटले आहे. पुरातत्व संरक्षण अधिनियम १९५८ अंतर्गत, संरक्षित स्मारकात फक्त पर्यटकांना परवानगी आहे. कोणत्याही धार्मिक कार्यांना नाही, असे पुरातत्व विभागाने म्हटले आहे.

# भाजपला चितपट करण्यासाठी महाविकास आघाडीची खेळी

## नवी मुंबई महापालिका निवडणुकांमध्ये एकत्र लढणार?

आधुनिक केसरी न्यूज

नवी मुंबई : राज्यात लवकरच मिनी विधानसभा अशी ख्याती असलेल्या महापालिका निवडणुकीचा बिगूल वाजणार आहे. राज्यातील अनेक प्रमुख शहरांमध्ये महापालिका निवडणुका होणार आहेत. यामध्ये नवी मुंबईचा देखील समावेश आहे. नवी मुंबई महापालिकेची देखील येत्या काही दिवसांमध्ये निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. विशेष म्हणजे नवी मुंबई महापालिका निवडणूक महाविकास आघाडी एकत्र लढणार असल्याची मोठी बातमी आता समोर आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नवी मुंबई महापालिकेच्या आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षातील प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत एकत्र निवडणूक लढण्याबाबत चर्चा झाली. या चर्चेत जागा वाटपाच्या फॉर्म्युल्यावर देखील चर्चा झाली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शशिकांत शिंदे, शिवसेना नेते विजय नाहटा, काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक उपस्थित होते. या बैठकीत 31 मे रोजी जाहीर होणाऱ्या आरक्षणानंतर जागा वाटपाचा फॉर्म्युला निश्चित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. आता या बैठकीचा निर्णय प्रदेश पातळीवर पाठवला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यातील अनेक महापालिकांचा कार्यकाळ संपून बरीच महिने लोटली आहेत. कोरोना संकट आणि ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या प्रश्नामुळे या निवडणुका आतापर्यंत रखडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाच्या याचिकेवर सुनावणी करताना काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाला दोन आठवड्यात निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याचा आदेश दिला. पण त्यावर निवडणूक आयोगाने पावसाचे कारण सांगितले. त्यावर सर्वोच्च न्यायालायने ज्या भागात पाऊस पडणार नाही त्याठिकाणी तातडीने जून महिन्यात निवडणुका घ्या, असे आदेश दिले. त्यामुळे राज्यात लवकरच महापालिका निवडणुकांचे बिगूल वाजण्याचे चिन्हे आहेत.

**सर्वच पक्ष कामाला लागले**

दरम्यान, महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आता सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत गेल्या दोन आठवड्यात दोन पेक्षा जास्त जाहीर सभा झाल्या आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील जाहीर सभा घेतली. त्यांची औरंगाबादमध्येही जाहीर सभा होणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यादेखील सभा झाल्या आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्यादेखील सभा सुरु आहेत. आगामी काळात या सभा आणखी वेगाने होते. राज्यात आगामी काळात निवडणुकीची प्रचंड मोठी रणधुमाळी बघायला मिळण्याची शक्यता आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चहा घ्यावा, चहा द्यावा ...!

आधुनिक केसरी

ही डॉक्टर मंडळी ना, कमालीची अरसिक बुवा...! नाहीतर काय ? काहीही सांगतात...! म्हणे दुपारी झोपू नका. आता दुपारची एखादी डुलकी घेतल्यावर किती फ्रेश वाटते ते यांना कोण सांगणार...! नंतर म्हणे चहा घेऊ नका, भजी इ. सारखे तळलेले पदार्थ खाऊ नका. सगळा नन्नाचा पाढा. आपण म्हणतो ना नकारात्मक बोलू नये. पण ते यांना ते कोण सांगणार...? आणि ते जे होकारात्मक सांगतात ते मानवत नाही. उदा. लवकर उठा, व्यायाम किंवा योगा करा. उकळलेले पाणी प्या. वगैरे. आणि हो डॉक्टरांकडे जाताना अशा वेळी सौ बरोबर नसली म्हणजे मिळवली." नाहीतर बघा, मी म्हणत होते ना... पण माझं मेलीचं कोण ऐकत...? असे काही ऐकून



घेण्याची तयारी ठेवावी." या डॉक्टरांच्याही पार्ट्या होतात म्हणे...! ओल्या वगैरे मी म्हणत नाही. त्यावेळी सगळे चालते मग पेशंटलाच गंभीर चेहऱ्याने असे सल्ले का देतात कुणास ठावूक? (हा सर्व मजकूर डॉक्टर मंडळींची माफी मागून लिहिला आहे. काय आहे बरेच डॉक्टर माझे मित्र आहेत. त्यांच्याकडे केव्हाही जावे लागेल तेव्हा माझी खैर नाही.) मंडळी हे सगळे लिहायला कारण असे झाले की, काल मी दुपारी थोडा वेळ झोपलो होतो. म्हणजे रोजच थोडा वेळ डुलकी चांगल्या शब्दात सांगायचे तर वामकुक्षी घेतो. काल जाग आल्यावर उठून पहिले तर मस्त पाऊस पडत होता. अशा वेळी माझा आवडता छंद म्हणजे बाहेर येऊन बसणे. आणि पाऊस न्याहाळणे. पावसाचा आनंद घेणे. हा आनंद घेत असताना हातात वाफाळत्या चहाचा कप असेल तर काय मजा येते महाराजा ..! (अशा वेळी गरम कांदा भजी असतील तर काय विचारता..! वि. वा. शिरवाडकरांना कांदा भजी खूप आवडत असत असे ऐकले आहे. या बाबतीत त्यांच्या आणि माझ्या आवडी जुळतात. पण कांदा भजी हा वेगळा विषय आहे. आज चहाबद्दलच बोलू या.) तर काल असाच बऱ्याच दिवसांनी पाहुण्यासारखा आलेल्या पावसाला निरखीत बसलो. मग काय चहाची तलफ आली. पण पाहतो तो काय आमच्या सौ.कुठेतरी बाहेर गेलेल्या. कधी कधी मी स्वतःही चहा बनवतो, पण हिच्या चहासारखा चहा काही मला जमत नाही. (आणि हे कबुल करण्यात मला कमीपणा वाटत नाही. माणसाने प्रामाणिक असावे. आणि काही काही गोष्टी कबूल करून टाकाव्यात) **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## समाजाची नैतिकता आणि संस्कृती घडवते शिक्षण

आधुनिक केसरी

शिक्षण माणसाला ज्ञान मिळवण्यास आणि जीवनात आत्मविश्वास वाढविण्यास मदत करते. हे आपल्याला करिअरमध्ये, वैयक्तिक सुधारणा करण्यास आणि व्यक्तिमत्व वाढीस मदत करू शकते. सुशिक्षित व्यक्तीच समाजाचा उत्तम नागरिक बनू शकते. हे आपल्याला जीवनात योग्य निर्णय घेण्यास मदत करते. कोणत्याही प्रकारचे शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास निश्चितच उपयुक्त ठरते. शिक्षणामुळे व्यक्तीचे ज्ञान, कौशल्ये सुधारतात, व्यक्तिमत्व आणि वृत्ती विकसित होते. सर्वात लक्षणीय बाब म्हणजे, शिक्षणामुळे रोजगाराच्या संधींवर सकारात्मक परिणाम होतो. उच्च शिक्षित व्यक्तीला चांगली नोकरी मिळण्याची शक्यता असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे जी प्रत्येकाला निवीन काही ना काही शिकण्यास, ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करण्यास मदत करते. शिक्षणामुळे समाजाची विचारसरणी सुधारते आणि सामाजिक दुष्कृत्यांचे समूळ उच्चाटन होण्यास मदत होते. अर्थातच, हे समाजातील असमानतेशी लढा देऊन देशाच्या समान विकासास मदत करते. खरे तर, शिक्षण ही यशाची गुरुकिल्ली आहे. शिक्षण आपल्याला शिकण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व ज्ञानाची जाणीव करून देते आणि ते आपल्याला प्रगती करण्यास मदत करते. शिक्षण हे एक असे आवश्यक साधन आहे, जे एखाद्याचे जीवन सुधारण्यासाठी ज्ञान, विश्वास, बळ आणि आनंद देते. शिक्षण प्रक्रियेत शिक्षणाच्या गुणवत्तेनुसार विविध पायऱ्यांचा समावेश होतो. ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, जी समाजाची नैतिकता आणि संस्कृती घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. नवकल्पना, उत्पादकता आणि मानवी भांडवल वाढवून शिक्षणामुळे आर्थिक वाढ होऊ शकते. शिक्षणामध्ये राजकीय सहभाग, सामाजिक समानता आणि पर्यावरणीय टिकाव यासारख्या गोष्टींना प्रोत्साहन देऊन सकारात्मक सामाजिक बदल घडवून आणण्याची क्षमता असते.



आधुनिक केसरी

## अद्वैत स्वरूप | सावळ्याचे ||

तूच सर्वकाळ | असो ध्यानी मनी ||
तुझ्यावीन कोणी | नको संग ||१||

चांगला वांगला | कशाला पारख ||
द्वैताचा आलेख | दावु नको ||२||

श्वासात खेळते | आत्म्याचे गुंजन ||
मौनात भजन | सावळ्याचे ||३||

लाविता कपाळी | टीळा चंदनाचा ||
गंध कस्तुरीचा | अभंगाला ||४||

शब्द शब्द न्हाला | वारीत गाताना ||
लोचनी मावेना | चंद्रभागा ||५||

आता सुखावलो | पाहुनीया रूप ||
अद्वैत स्वरूप | सावळ्याचे ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी**
**सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः।**
**प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो**
**नृपाङ्गणगतः खलो मनसि सप्त शल्यानि मे ।।**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अर्थ :** दिवसा निस्तेज झालेला चंद्र, तारुण्यानंतरची सुन्दर स्त्री, कमलविहीन सरोवर, सुंदर शरीराकृती असलेला विद्याविहीन व्यक्ती, धनासक्त स्वामी, दीर्घकाळापासून संकटग्रस्त सज्जन, आणि राजाच्या निकट असलेले दुर्जन या सातांना मी माझे मनातील शल्याप्रमाणे मानतो. कवीश्रेष्ठ भर्तृहरी हे स्वतः एक राजा देखील होते. त्यामुळे त्यांनी समाजाकडे पाहताना कवी आणि राजा या दोनही भूमिकांमधून पाहीले. या श्लोकात त्यांच्या या दोनही भूमिका स्पष्ट होतात. एक कवी म्हणून आणि एक राजा म्हणून समाजातील कोणत्या गोष्टी त्यांना खटकतात, या विषयी कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकात प्रतिपादन केले आहे.

# ।। दासबोध स्तवन ।।



## मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी

ओवी क्रमांक 24 च्या पुढे समर्थ मुमुक्षलक्षण पुढील प्रमाणे करतात. वाचक मित्रांनो हे वाचत असताना प्रत्येकाने आपल्या वागण्याचा, बोलण्याचा विचार करून आपण कुठे आहोत हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. आणि आपल्यात बदल करायचे आहेत. हे या निमित्ताने नम्रतेने सांगणे आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

**मुमुक्षलक्षण**

जो मनापासून पुण्यमार्ग आचरण्याचे ठरवतो,सत्संगाची इच्छा करतो. आणि संसाराबद्दल विरक्त होतो तो मुमुक्षु होय. जिथे मोठमोठे चक्रवर्ती राजे आपले राज्य घालवून बसले,त्याच्यापुढे आपले वैभव काहीच नाही असा विवेक ऊत्पन्न होऊन ज्याला सत्संगाची ओढ लागते तो मुमुक्षु होय. जो स्वतः चे दोष पाहूं लागतो आणि वैराग्याच्या शक्तीने जो त्यांना बरोबर जाणतो,मग स्वतः आपणच आपली उद्वेगाने निंदा करू लागतो,तो मुमुक्षु होय.

आपण अगदींच हीन,दीन,नालायक,टाकाऊ आणि पापी आहोत असे मुमुक्षाला खरेंच वाटते. परमार्थ साधनामध्ये जीवाला काही काळ अशा अनुतापाच्या अवस्थेत रहावे लागते. खरं तर त्याने स्वतः ला लावलेली विशेषणें कधीतरी अतिशयोक्त असतात. परंतु अंगी शरणागत् भाव येण्यास ती फार ऊपयोगी पडतात.

मुमुक्षु म्हणतो "मी तर कोणावरही उपकार न करणारा, दंभाने वागणारा वाईट कामे करणारा असा आहे. मी भ्रष्ट, चांडाळ दुराचारी, दुष्टपापी आहे, मी अभक्त, दुर्जन,हीनाहून हीन व जणू काय पाषाण आहे. मी दुराभिमानी आहे, रागीट वर्तनाचा,व्यसनाधीन आहे. मी आळशी,अंगचोर ,कपटी भित्रा,मूर्ख आणि अविचारी आहे. मी नालायक,बडबड्या, पाखंडी,तोंड टाकून बोलणारा, वाकड्या बुद्धीचा,वाईट विचारांचा आहे. **(क्रमशः)**

# सदगुरु कशासाठी हवा?

महाभारतातलीच एक कथा आहे. द्रौपदी स्वयंवरात सर्व राजे, युवराज आपापलं कौशल्य पणाला लावून मत्स्यभेद करण्याची पराकाष्ठा करीत होते. पणही विलक्षणच होता! उंच छताला एक चक्र फिरत राहणार. त्याच्या एका आरीवर लाकडी मासा बांधलेला. ते चक्र फिरत असताना नेम साधून त्या माशाच्या डोळ्याचा भेद करायचा.

उः! एवढंच? नाही! ते तर कुणीही करेल! इथे तर एकाहून एक निष्णात धनुर्धर उपस्थित होते! अन् स्वयंवर साक्षात याज्ञसेनीचं! सर्वच प्रतिस्पर्धी इरेस पेटलेले! परंतु खरी मेख पुढेच होती!!

नेम सरळ माशाकडे बघून धरायचा नव्हता. खाली भलंमोठं तसराळं पाणी भरून ठेवलं होतं. वर मासा लावलेलं चक्र फिरत असताना खाली तसराळ्यात बघून नेम धरायचा होता अन् माशाच्या डोळ्याचा वेध घ्यायचा होता! इथेच सर्वांचा हिरमोड झाला होता. नीट नेम धरणारे भले भले पाण्याच्या तरंगांमुळे चक्क पराभूत झाले होते. एकेक धुरंधर हताश होऊन परतलेत. लक्ष्यभेद करायला अर्जुन पुढे सरसावला. एक क्षण त्याने कृष्णाकडे बघितलं. कृष्णानी खूण करून त्याला निकट



बोलावलं. सूचना केली,

"हे बघ, मन शांत ठेव. नीट वीरासन घाल. धनुष्यावर बाण चढव, प्रत्यंचा ओढल्यावर हात स्थिर ठेव. पापणीसुध्दा लवू देऊ नकोस! नेमक्या क्षणी तीर सोड - बाकी मी पाहून घेईन."

अर्जुन हासला.

"काय झालं? कां हसलास?"

"कृष्णा, वीरासन मी घालणार, नेम मी धरणार, तीर पण मीच सोडणार. तुला करायला बाकी उरलं काय रे?"

आता स्वतः कृष्ण हसलेत.

"पार्थ, हे सर्व तुलाच करायचंय. मी फक्त तेवढंच करणारे जे तुला नाही जमणार."

"हुः! अन् ते काय असणारे?"

"सांगू? जमेल तुला?"

"सांग बघु..."

"त्या तसराळ्यातलं पाणी स्थीर ठेवण्याचं काम माझं"

एक क्षण विचार केल्याबरोब्बर अर्जुन शहारला! सावध झाला!

दुसऱ्याच क्षणी डोळे मिटले. मनोमन कृष्णाला वंदन करून पण जिंकायला आत्मविश्वासाने पुढे सरसावला.

पुढे काय झालं सर्वांनाच माहितीये!

हरिकृपेचा महिमाच असा असतो! त्याची सोबत होती म्हणून पाचांच्या केसालाही धक्का लागला नाही. अन् त्याचीच सोबत नव्हती, तर शंभरातला एकही वाचला नाही.

# बदलत्या काळानुसार दीक्षांत समारंभाचे स्वरूप बदलणार : उच्च शिक्षणमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दीक्षांत समारंभाचे स्वरुप इंग्रजांच्या काळापासून आजही तसेच कायम आहे. यापुढे दीक्षांत समारंभाचे स्वरुप बदलवून ते मराठमोळ्या पद्धतीने आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिले. राजनगर येथील राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये शासकीय तंत्र निकेतन स्वायत्त संस्थेचा 24 वा पदविका प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.



शासकीय तंत्र निकेतनचे प्राचार्य तथा नियामक मंडळाचे सदस्य सचिव डॉ. मनोज डायगव्हाणे, नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेजचे संचालक राजेश चौधरी, शासकीय तंत्र निकेतनचे सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव, परीक्षा नियंत्रक डॉ. एस. बारस्कर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पदविका प्रदान समारंभ हा विद्यार्थ्यांसाठी असतो. त्यामुळे असा कार्यक्रम विद्यार्थी केंद्रितच असावा, असे सांगून सामंत पुढे म्हणाले की, पदविका प्रदान समारंभ हा विद्यार्थ्यांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारा असावा. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी या सोहळयातच मार्गदर्शन मिळावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश असावा. बदलत्या काळानुसार, पुढील काळात दीक्षांत समारंभाचे स्वरुप बदलविण्यात येईल. पदविका प्रदान समारंभात विद्यार्थ्यांना करिअरबाबत मार्गदर्शन मिळण्यासाठी उद्योग, स्वयंरोजगार, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, नामांकित कंपन्यांचे व्यावसायिक यांना आमंत्रित करण्यात येईल. विद्यार्थ्यांना या मार्गदर्शनाचा लाभ होईल. यामुळे पदविका प्रदान समारंभात भविष्यात आपल्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली अनुभवाची शिदोरी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांमार्फत मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांनी अनेक अडचणींचा सामना करीत अभ्यास केला. त्या काळात ऑनलाईन परीक्षा ही गरज होती. परंतु आता ऑफलाईन परीक्षा पद्धती स्वीकार करणे गरजेचे आहे. यासाठी विद्यार्थ्यांची मानसिकता बदलवून त्यांचे समुपदेशन करण्यासाठी प्राचार्य व प्राध्यापकांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

प्राचार्य डॉ. मनोज डायगव्हाणे यांनी यावेळी संस्थेची माहिती दिली. शासकीय तंत्र निकेतन नागपूर ही शंभर वर्षांहून अधिक जुनी संस्था आहे. या संस्थेला उत्तम वारसा लाभला आहे. विद्यार्थ्यांनी या संस्थेचा केवळ नावलौकिकच टिकवून ठेवायचा नाही तर तो वाढवायचा आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार आता एकाच वेळी विविध विद्याशाखांचा अभ्यास करण्याचा पर्यायही उपलब्ध होणार आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी विचारपूर्व पुढील शिक्षणाचा पर्याय निवडून योग्य दिशेने वाटचाल करण्यासंबंधी डॉ. डायगव्हाणे यांनी मार्गदर्शन केले. दविका प्राप्त करणे हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा महत्त्वाचा टप्पा आहे. या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमात विविध पर्याय उपलब्ध आहेत. या विद्याशाखेच्या तांत्रिक ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी सफल अभ्यास केला आहे. विद्यार्थ्यांनी या ज्ञानाचा उपयोग देशाच्या कल्याणासाठी करावा, असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. तत्पूर्वी राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाच्या प्रांगणातील 'ब्रेव्ह फायर फायटर'च्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. पदविका प्रदान सोहळ्यापूर्वी डॉ. डायगव्हाणे यांनी शासकीय तंत्रनिकेतनच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. मान्यवरांच्या उपस्थितीत नागपूर शासकीय तंत्रनिकेतन व नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यानंतर पदविका प्रदान समारंभाची घोषणा डॉ.डी.व्ही. जाधव यांनी केली. विविध विद्याशाखेतील पदविकाधारकांना यावेळी पदविका प्रदान करण्यात आल्यात. सिव्हिल इंजिनियरिंग, मेकॅनिकल इंजिनियरिंग, इलेक्ट्रीकल इंजिनियरिंग, ट्रॅव्हलर्स अँड टुरिझम आदी विद्याशाखेत पदविका प्राप्त करणाऱ्या प्रथम आणि व्दितीय क्रमांक मिळविलेल्या पदविकाधारकांना पदक, प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले. यानंतर पदविका धारकांकडून प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन अधिव्याख्याता मेघा मचाले तर आभार एम.व्ही. सरोदे यांनी मानले. पदविका प्रदान समारंभाच्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या मान्यवरांनी दीक्षांत समारंभाचे उत्तरीय परिधान केले होते. शासकीय तंत्रनिकेतनच्या विविध विद्या शाखेचे विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## श्री गणेश सोसायटीत ७६ उमेदवारांचे अर्ज दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** गणेश विविध सहकारी सोसायटीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १९ जून रोजी होणाऱ्या मतदानासाठी १३ जागांसाठी ७६ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. लोणार तालुक्यातील सर्वात मोठी सोसायटी असल्यामुळे या सोसायटीमध्ये तालुक्यातील १० गावांतील मतदारांचा समावेश आहे. ही १० गावांची मिळून निर्माण केलेली सोसायटी असून यामध्ये लोणार, वडगाव तेजन, सोमठाणा, कोयाळी दहातोंडे, पिंपळखुटा, सरस्वती, शिंदि आणि किन्ही या गावांचा समावेश आहे.

आज आवेदनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिवशी १३ जागांसाठी ७६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यामध्ये सर्वसाधारण ८ जागांसाठी ४० उमेदवारी अर्ज, महिला राखीव २ जागांसाठी ११ अर्ज, इतर मागास प्रवर्गासाठी राखीव १ जागेसाठी १७ अर्ज, भटक्या विमुक्त जाती व जमातीसाठी १ जागेसाठी ३ अर्ज, अनुसूचित जाती जमातीसाठीच्या १ जागेसाठी ५ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. २४ मे रोजी उमेदवारांचे अर्ज छाननीची शेवटची तारीख असल्यामुळे २५ ते ८ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख असल्यामुळे या निवडणूक प्रक्रियेमध्ये शेवटपर्यंत निवडणुकीच्या आखाड्यात किती उमेदवारी अर्ज कायम राहतात याकडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले आहे. १९ जूनला या निवडणुकीचे मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये तालुक्यासह शहरातील दिग्गज पुढारी यांनी उमेदवारी अर्ज सादर केले आहेत.



## पत्रकार निवेदिता मदाने यांना पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राष्ट्राच्या विकासात देशाला गतीशील विचार देण्याचे काम साहित्य रकरते. आज आझादीच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारत प्रकाशनाची ऑर्गनायझर आणि पांचजन्य या दोन साप्ताहिकांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

या दोन ही साप्ताहिकांचा हिरक महोत्सव समारंभ दिल्लीत चाणक्य पूरी येथील द अशोक हॉटेल येथे संपन्न झाला. यानिमित्ताने 'द मिडीया अॅवार्ड महामंथन' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमात सुरुवातीला परिसंवाद आणि हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, गोवा, आसाम या पाच राज्यांतील मुख्यमंत्र्यांसोबत तेथील विकास, योजना, प्रगती याविषयावर वार्तालापाचे आयोजन केले होते.

दरम्यान पुरस्कार वितरणानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी प्रकाशनाच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा देताना प्रतिपादन केले की, भारत देशातील सर्वच क्षेत्रातील वेळोवेळीचे ज्वलंत विषय आणि त्यावरील विविध संपादकीयने एक ऐतिहासिक वारसा जतन केला आहे. तो संदर्भ रुपाने नव्या पिढीला अभ्यासता येईल. याप्रसंगी प्रकाशन संस्थेचे आर्थिक सल्लागारआशिष खरे यांनी आभार मानले. पुरस्कार सोहळ्यचे प्रास्ताविक प्रकाशन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक भारत भूषण अरोरा यांनी केले.

पुरस्कार सोहळ्यातील विविध श्रेणीत REGIONAL LANGUAGE PRINT सर्वोच्च प्रादेशिक भाषेतील मुद्रण पत्रकारिता या श्रेणीत निवेदिता मदाने-वैशंपायन यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारवितरणाप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, पांचजन्य संपादक हितेश शंकर, भारत भूषण (भारत प्रकाशन), रमेश बिदुडी (खासदार दक्षिण दिल्ली), विजय गोयल (माजी क्रीडा आणि विदेश राज्यमंत्री) आदी मान्यवर उपस्थिती होते.



## थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करा

### सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करणारी महावितरण आर्थिक संकटात आहे. त्यामुळे थकीत व चालू वीजबिलांचा भरणा करून वीजग्राहकांनी सहकार्य करावे. अन्यथा बिल न भरणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा तात्काळ खंडित करावा, असे स्पष्ट निर्देश महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांनी दिले आहेत.

डांगे यांनी जळगाव येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जळगाव, धुळे व नंदुरबार मंडलाची आढावा बैठक मंगळवारी (२४ मे) घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता कैलास हुमणे, जळगाव मंडलाचे अधीक्षक अभियंता फारूक शेख, धुळे मंडलाचे अधीक्षक अभियंता पंकज तगलपल्लेवार व नंदुरबार मंडलाचे अनिल बोरसे मंचावर उपस्थित होते.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक डांगे म्हणाले की, 'ना नफा, ना तोटा' तत्वाने वीजसेवा देणाऱ्या महावितरणवर एक ग्राहक म्हणून वीजखरेदी, पारेषण खर्च तसेच विविध कर्ज व त्याच्या हप्त्यांचे सद्यस्थितीत करोडो रुपयांचे दायित्व आहे. दुसरीकडे महावितरणच्या वीजग्राहकांकडे थकबाकीचा मोठा डोंगर आहे. या गंभीर आर्थिक संकटामुळे महावितरणच्या अस्तित्वाचा सध्या बिकट प्रश्न निर्माण झालेला आहे. वीज ही मूलभूत गरज असतानाही ग्राहक इतर अनेक सेवांचे पैसे देतात. मात्र मूलभूत गरज असलेल्या विजेचे बिल भरत नाहीत. त्यामुळे थकबाकीदार ग्राहकांवर कारवाई करण्याचे निर्देश सहव्यवस्थापकीय संचालक डांगे यांनी दिले.

ग्राहकांना दरमहा त्यांनी वापरलेल्या विजेचे बिल अचूक व वेळेत देण्यासाठी मीटर एजन्सी नेमण्यात आलेल्या आहेत. या एजन्सींना मीटर रीडिंग घेताना फोटोंचा दर्जा सुधारण्यास व अचूक काम करण्यास सांगितले आहे. मात्र कार्यक्षमता न सुधारल्यास संबंधित मीटर रीडिंग एजन्सींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता कैलास हुमणे यांनी विविध विषयाचा आढावा घेऊन या महिन्यात वीजबिल वसुलीसह ग्राहकसेवा आणखी गतिमानतेने करण्याचे आवाहन केले. बैठकीला जळगाव परिमंडलातील सर्व कार्यकारी अभियंते, जळगाव मंडलातील सर्व उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, अधिकारी व मीटर रीडिंग एजन्सीचे कर्मचारी उपस्थित होते.

## राजीव गांधींनी केलेल्या संगणक क्रांतीमुळे शेतकऱ्यांची प्रगतीकडे वाटचाल : माणिकराव ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे २१ मे रोजी राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार वितरण सोहळा काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. शेतकऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारा राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार राज्यातील २६ प्रगतशील शेतकऱ्यांसह उत्कृष्ट तिफणकारी शेतमजुराचा तिफण प्रदान करून वैशिष्ट्यपूर्ण भावस्पर्शी सन्मान करण्यात आला. कृषीमित्र, कृषीमित्र, कृषी वैद्यांनीक, महिला शेतकरी, कृषी पत्रकार, शेतकरी उत्पादक कंपनी यांना मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आला. राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांचे गेल्या १६ वर्षांपासून शेतकरी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. याप्रसंगी राजीव गांधी कृषिरत्न शेतकरी निवड समितीचे अध्यक्षा सौ. पोर्णिमाताई सवाई, अशोकरावजी मोरे, भैय्यासाहेब निचळ, प्रा. दिलीपराव काळे प्रा अमर तायडे, प्रा हेमंत डिके, विलास सवाने आदी मान्यवर उपस्थित होते.



# सर्व भाषांना महत्व

आधुनिक केसरी

सध्या देशात खास करुन बॉलिवूड तसेच दाक्षिणात्य कलाकारांमुळे राष्ट्रीय भाषा या विषयावरुन मतमतांतरे असल्याचे पहायला मिळत आहे. अजय देवगण, किच्चा सुदीपसारख्या लोकप्रिय कलाकारांनी या विषयावर व्यक्त केलेल्या मतांमुळे मोठा वाद निर्माण झालेला असतानाच आतार केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या विषयावर शैक्षणिक दृष्टीकोनातून महत्वाचे वक्तव्य केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार देशातील सर्व स्थानिक भाषा या राष्ट्रीय भाषाच असल्याचे शिक्षणमंत्र्यांनी म्हटले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत सर्व भाषणांना समान पद्धीने महत्व दिले जाणार असल्याचेही शिक्षणमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. नवीन शैक्षणिक धोरण निर्माण करताना सर्व भाषांना महत्व देण्याच्या दृष्टीने निर्णय केंद्रातील भाजपा सरकारने घेतल्याचे शिक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणादरम्यान अधोरेखित केले. हिंदी असो इंग्रजी असो किंवा इतर कोणतीही भाषा असो देशभरामध्ये वापरल्या जाणाऱ्या या भाषांइतक्याच स्थानिक भाषाही महत्वाच्या आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये हेच अधोरेखित करण्यात आले, असे केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नॉर्श इस्ट हिल युनीव्हर्सिटीच्या २७ व्या दीक्षांत समारंभच्या वेळेस बोलताना सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सर्व स्थानिक भाषांना महत्व देण्यात आल्याचेही धर्मेंद्र प्रधान म्हणाले. नवीन शैक्षणिक धोरणांअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व भाषा या राष्ट्रीय भाषा असल्याचे धोरण निश्चित केले. त्यामुळेच गारो, खासी, जैंतिया (मेघालयमधील स्थानिक भाषा) राष्ट्रीय भाषा आहेत, असे धर्मेंद्र प्रधान म्हणाले. या विद्यापिठामधून १६ हजार विद्यार्थींचा दिक्षांत समारंभ पार पडला. पदवी घेऊन विद्यापिठाबाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोकरी देणारे उद्योजक व्हावे आणि त्यांनी समाजावर सकारात्मक परिणाम करणारे निर्णय घ्यावेत अशा शुभेच्छा शिक्षणमंत्र्यांनी दिल्या. समाजाने दिलेल्या योगदानामुळे तुम्ही इथपर्यंत शिक्षण घेऊ शकला. आता तुम्हाला नोकऱ्या देणारा वर्ग म्हणून पुढे येण्याची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यी समाजाला काहीतरी देणे लागतो. तुम्ही काहीतरी सकारात्मक करावे असे मी आवाहन करतो. तुम्ही समाजासाठी भरघोस योगदान द्यावे, असे शिक्षणमंत्र्यांनी म्हटले.



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र. 8149498020

# मेहूण तापीतीरच संत मुक्ताईचे तिरोभूत स्थळ!

आधुनिक केसरी

**श्रीक्षेत्र मेहूण तापीतीर (ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) येथे श्री संत आदीशक्ती मुक्ताई शके 1219 मध्ये वैशाख वद्य दशमीच्या दिवशी गुप्त झाल्या. या घटनेला बुधवार, दि. 25 मे 2022 रोजी 725 वर्षे पूर्ण होत आहेत. या घटनेच्या सप्त शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त संत मुक्ताई यांच्या विषयी घेतलेला थोडक्यात आढावा.**

संत आदीशक्ती मुक्ताई व्यतिरिक्त संत ज्ञानेश्वरादी भावंडांनी संजीवन समाधी घेतली तर आदीशक्ती मुक्ताई तापीतिरी गुप्त झाल्या असा श्री संत नामदेव महाराजांच्या अभंगात उल्लेख आहे. नामदेवांनी चारही भावंडे व चांगदेवरायांच्या समाधी प्रसंगांचे वर्णन करणारे विस्तृत असे अभंगरूपाने वर्णन केलेले आहे. ते त्यावेळी प्रत्यक्ष हजर असल्यामुळे त्यांच्या अभंगांना असामान्य असे महत्व प्राप्त झालेले आहे. श्री संत ज्ञानेश्वरांनी आळंदी, सोपानदेवांनी सासवड तर चांगदेवांनी पुणतांबे येथे समाधी घेतली. चांगदेवांचा समाधी सोहळा आटोपल्यानंतर संत निवृत्तीनाथ, संत नामदेव यांच्यासह सर्व संत मंडळी नेवासे येथे आली.

**तेथूनी वैष्णव आले नेवाशासी |**
**सह समुदायेसी देवराज ॥**

त्यानंतर सर्वांनी म्हाळसादेवी, टोकेश्वर, पैठण, आपेगाव, वेरूळ आदी तिर्थक्षेत्रांचे दर्शन घेतले. यादरम्यान नामदेव महाराज देवाला विचारतात,

**नामा म्हणे देवा जाता तातडीने |**
**पुढे स्थळ कोण नेमियेले ॥**
**चालिले श्रीरंग वैष्णवाचे भार |**
**पहावे तापीतीर नामा म्हणे ॥**

तापी तिराच्या संदर्भात विचार केला तर तापी नदीच्या उगमापासून म्हणजेच मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यापासून ते सूरतपर्यंत नदीच्या दोन्ही बाजूला तापीतीर म्हटले जाते. महाराष्ट्रापुरता विचार केला तर मुक्ताईनगर तालुक्यातील तर गुजरातच्या सीमेपर्यंत म्हणजेच प्रकाशा शहादापर्यंत तापीतीर म्हणता येते. त्यामुळे नेमके तापीतीर कुठले? तर त्यावेळी स्वतः पांडुरंग सांगतात त्याचे वर्णन नामदेव महाराज अभंगरूपाने करतात,

**तापीचिये तिरी महत्ग्राम थोर । असे सोमेश्वर पुरातन॥**

तापी नदीच्या तिरावर महत्ग्राम म्हणजे सध्याचे मेहूण ता. मुक्ताईनगर हे स्थान आहे. तेथे पुरातन काळापासून भगवान भोलेनाथ सोमेश्वर नांदत आहेत. या ठिकाणाचा नेमका निर्देश करण्यासाठी नामदेवांनी पुढे म्हटले आहे की,

**तेथे परशुरामे मारियेला बाण ।**
**पहा ती पुरातन पश्चिमेस ॥**

संत नामदेवांचे हे म्हणणे दिशादर्शक आहे. यातून नामदेवांना दिशा दाखवायची आहे. याआधीच्या अभंगांमध्ये तापीतीर, महत्ग्राम, सोमेश्वर असा उल्लेख आहे. मात्र हे स्थान नेमके कोठे? यासंदर्भात नामदेव महाराज दिशानिर्देश करून सांगतात की, ज्या ठिकाणी परशुरामाने बाण मारलेला आहे त्या ठिकाणाच्या पश्चिमेस संत मुक्ताई गुप्त होण्याचे स्थान आहे. आजही आपण जर परशुरामांनी ज्याठिकाणी बाण मारलेला आहे तेथून पश्चिमेस पाहिले तर मेहूण येथील संत आदीशक्ती मुक्ताई देवस्थानाचाच निर्देश होतो. ज्याप्रमाणे विठ्ठलाची कितीही मंदीरे असली तरी पंढरपूरच्या विठ्ठलाचे विशेष महत्व आहे अगदी त्याचप्रमाणे संत आदीशक्ती मुक्ताई यांची इतर ठिकाणी कितीही मंदीरे असली तरी ती मंदीरे तापीतिरावर नसल्याने, परशुरामाने बाण मारल्याच्या पश्चिमेस नसल्याने, सोमेश्वराच्या सान्निध्यात नसल्याने श्री क्षेत्र मेहूण येथील संत आदीशक्ती मुक्ताई यांच्या






देवस्थानालाच विशेष महत्व आहे. हे तिनही पुरावे स्वतः पांडुरंगाने सांगितले असून नामदेवांनी त्याचे वर्णन अभंगरूपाने केलेले आहे. त्याचप्रमाणे वैशाख वद्य दशमीच्या दिवशी तापीतीरावर अंघोळ केल्यानंतर,

**करोनिया स्नान बैसले बाहेर ।**
**म्हणती अंधःकार फार झाला ॥**

याचा अर्थ अंघोळीनंतर सर्व संतमंडळी तापीतीरावरच बसली. त्यानंतर अतिशय जोरदार वारा वाहू लागला आणि सगळ्यांचे डोळे झाकले गेले. त्याचवेळी,

**कडाडली वीज निरंजनी जेव्हा ।**
**मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ॥**

जेव्हा वीज कडाडली तेव्हा आदीशक्ती मुक्ताई गुप्त झाली असा त्याचा कालदर्शक निर्देश आलेला आहे. पुढे नामदेवांनी असे म्हटले आहे की,

**मुक्ताबाई मुक्त केली केशवराजे ।**
**नामा म्हणे पूजा तापीतिरा ॥**

तापीतीराची पूजा आजही श्री क्षेत्र मेहूण येथे अनन्यभावाने केली जाते. त्यामुळे मेहूण येथीलच तापीतीर संत आदीशक्ती मुक्ताई यांचे गुप्त स्थान आहे. दुसरा महत्वाचा पुरावा चांगदेवांनी दिलेला आहे. सर्वगुणसंपन्न, विद्याविशारद, योगप्रक्रियेने चौदाशे वर्ष शरीर जतन करून ठेवणारे चांगदेवराय संत आदीशक्ती मुक्ताई यांचे लाडके शिष्य होते. अशा चांगदेवांनी मुक्ताई गुप्त होण्याच्या स्थळासंबंधीचा आगळावेगळा पुरावा दिलेला आहे, त्याला तोड नाही. ते म्हणतात,

**धन्य धन्य मुक्ताबाई । तुमचे चरणी माझे डोई ॥**
**माझा केला अंगिकार । दाखविला परात्पर ॥**
**तेथे नांदे सोमेश्वर । तापीपूर्णा बरोबर ॥**
**चांगा आला लोटांगणी । लोळे मुक्ताई चरणी ॥**

हा पुरावा आगळावेगळा कसा? तर मुक्ताई गुप्त होण्याच्या आधी त्यांनी हा अभंग लिहीलेला आहे. कारण मुक्ताई गुप्त होण्याच्या आधीच चांगदेवांनी समाधी घेतली होती. त्यांनी आधीच हे स्थळ कसे सांगितले? तर चांगदेव त्रिकालज्ञानी तर होतेच परंतु त्याबरोबर ते मुक्ताई अनुग्रहीत होते. तसेच चांगदेव महाराज चौदाशे वर्ष तापीतीर रहिवाशी असल्याने तसेच पुढील काळात संत मुक्ताई गुप्त स्थान त्यांच्या वास्तव्यापासून तापीतीराने फक्त दोन मैलच अंतरावर असल्यामुळे एक शिष्याचे कर्तव्य म्हणून त्यांनी हा अभंगाचा पुरावा दिलेला आहे. यात दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. सोमेश्वराचे नांदणे आणि तापीपूर्णाचे बरोबर वाहणे. ही परिस्थिती श्री क्षेत्र मेहूण येथेच आढळते. चांगदेवला तापी व पूर्णा नदीचा संगम होवून पुढे त्या नद्या एकमेकांच्या सोबत वाहत वाहत मेहूण येथे आलेल्या दिसतात. आजही श्री क्षेत्र मेहूण येथील देवस्थानाजवळील तापीतिरावरून नदीकडे पहिल्यास तापीनदीचे पाणी काळेभोर तर पूर्णामाईचे पाणी गढूळ दिसते. जगकल्याणाची आंतरीक इच्छा असल्यामुळे चांगदेवांनी संत मुक्ताई गुप्त होण्याचे स्थळ आधीच सांगून आपण लाडके शिष्य होण्याचे, मुक्ताई भक्त होण्याचे कर्तव्य पार पाडलेले आहे. संत आदीशक्ती मुक्ताई संदर्भात सांगावयाचे झाल्यास,

**महाकल्पावरी चिरंजीव शरीर । किर्ती चराचर त्रिभुवनी ॥**

श्री संत मुक्ताई महाकल्पार्यंत याच शरीरानिशी आजही मेहूण येथे आहेत. हा अधिकाराचा विषय आहे. अधिकारसंपन्न साधकाला आजही याची प्रचिती मेहूण येथे येते. तापीतिरावर असणाऱ्या एका जागृत देवस्थानाचे तथा शिवशक्ती पिठाचे हे अनुभवगम्य ज्ञान आहे, एक गुपीत आहे, एक दर्शन आहे. याच तिर्थक्षेत्रावर म्हणजे जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यात असणाऱ्या श्रीक्षेत्र मेहूण येथे बुधवार, दि. 25 मे 2022 रोजी श्री संत आदीशक्ती मुक्ताई यांचा 725 वा तिरोभूत म्हणजे गुप्तदिन सोहळा होत आहे. संत आदीशक्ती मुक्ताईंना कोटी कोटी अभिवादन...!

# जनसामान्यांचे नेते : स्व.एकनाथराव घुगे

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

एकजण जालन्यास व एक जण गावात रहात असे. गावातून येतांना जातांना त्यांची गाडी लोकांनी भरलेली असे. आपल्या गावाची नाळ त्यांनी तुटू दिली नाही. तसेच आपल्या विकासाचा आलेख सतत चढता ठेवला. तो आजपर्यंत कायम आहे. साधी राहणी व उच्च विचाराचे अण्णा सतत कामात असत. पिठाच्या गिरणीपासून, मंडम, मळणी यंत्र, बोअर मशीन, ट्रॅक्टर, ते आज जेसीबी, पोकलेन अशी साधने त्यांच्याकडे होती आजही आहे. मराठवाडा विभागात ते एक नांमा कित शासकीय गुत्तेदार व उद्योजक होते. असा नेता तयार व्हायला अनेक पिढ्या जाव्या लागतात. एकनाथ राव घुगे अण्णा व भानुदासराव घुगे नाना ही भावंडे समाजात एक मोठा आदर्श ठेऊन होते. नातेगोते, सण, उत्सव, लग्न कार्य, यात्रा उत्सव, अखंड हरिनाम सप्ताह आदी कार्यक्रमात स्व. एकनाथराव घुगे नेहमीच सहभागी व्हायचे. सामान्य कुटूंबातून आल्यामुळे



त्यांना गरिबीची जाणिव होती. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी आपल्यातील ही संवेदनशीलता व माणूसकी जपली. एकत्र कुटूंब. सर्वांना सोबत घेऊन जगणे. अडल्या नडलेल्यांना नेहमी मदतीचा हात देणे हा त्यांचा स्थायी भाव होता . आमच्या देशगव्हाण गावी त्यांची बहीण पालवे परिवारात दिलेली असल्यामुळे आमच्या गावी त्यांचे नेहमीच येणे जाणे होते. तसेच त्यांच्या गावीही माझी मावस बहिण व इतर नातेवाईक असल्यामुळे भराडखेडला नेहमी जाणे होत. त्यामुळेच लहानपणापासून मी त्यांचा ,कुटूंबांचा प्रवास पहात आलोय , शुन्यातून सुरु झालेला त्यांचा प्रवास हजारो पिढ्यांना आजही प्रेरणादायी आहे. सामान्यातून असामान्यत्वाला पोहचलेले ते जन सामान्यांचे नेते होते . सरपंच ते विधानसभा लढणे आणि एक उद्योजक म्हणून त्यांचा हा प्रवास थक्क करणारा होता.आजही त्यांची परंपरा , सामाजिक , राजकीय , सेवेचा वसा व वारसा भानुदास नाना व त्यांचे चिरंजीव शिवसेनेचे युवा नेते भाऊसाहेब घुगे चालवित आहेत . स्व .एकनाथराव घुगे यांचे अकाली जाणे हे दुर्दैवी आहे ,त्यांचे आमदार होण्याचे स्वप्न त्यांचे चिरजिव भाऊसाहेब घुगे पुर्ण करतील. कारण भाऊसाहेब घुगे यांनी आपल्या वडिलाचा समर्थ वसा आणि वारसा आपल्या कर्तृत्वाने पुढे चालविला आहे. आपल्या गावा बरोबरच बदनापूर तालुक्यात भाऊसाहेब घुगे यांनी अनेक विकास कामे खेचून आणली आहेत. शेती व्यवसायाला तंत्रज्ञानाची जोड देऊन विक्रमी उत्पन्न ते घेत आहेत. राजकीय , सामाजिक कार्यात भाऊसाहेब घुगे हे आपल्या वडिलांच्या विचाराने प्रेरित होऊन कार्यरत आहे. स्व एकनाथराव घुगे यांना जाऊन सोळा वर्ष झाले तरी ते आपल्यात नाही असे वाटतच नाहीत. दरवर्षी आपल्या वडिलांच्या स्मृति चिरंतन रहाण्यासाठी तसेच त्यांचे विचार व कार्य समाजापुढे यावे , व्यापक समाज प्रबोधन व्हावे या उद्देशाने आपल्या गावी कीर्तन , वृक्षारोपण आदी कार्यक्रम आयोजित करतात. २५ मे २०२२ रोजी स्व. एकनाथराव घुगे यांच्या पुण्य स्मरणार्थ भराडखेडा येथे भव्य कीर्तन सोहळा संपन्न होत आहे. ते जनाधार असलेले , सामान्यातील सामान्य जनमाणसांचे नेते होते. स्व. अण्णांच्या स्मृतिस विनम्र अभिवादन.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतकरी



दिलीप देशपांडे
मो.नं.८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**अनेक देशात जसे अमेरिका ऑस्ट्रेलिया इस्रायल आदी देशांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली जाते. मात्र आपल्या देशात अजूनही पारंपारिक पद्धतीने शेती केली जाते. फार कमी प्रमाणात शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतात. परंतु अल्प, अत्यल्प, आणि कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना अशा तंत्रज्ञानाचा वापर सर्रासपणे करणे जमत नाही. किंवा जमलेले नाही. त्याला अनेक कारणे आहेत.**

जरी आधुनिक पद्धतीच्या शेतीने मनुष्यबळाचा वापर कमी करून उत्पादन काढू शकतो असे म्हटले तरी एकूणच विचार करता आपल्याकडे ते होऊ शकले नाही. कारण जवळपास 50 ते 60 टक्के शेतकरी अद्यापही आपल्या शेतात त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यास असमर्थ आहे. आणि अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा काहीचा तो थोडा वापर करतो आणि काही शेती तंत्रज्ञान मात्र आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्याने तो तंत्रज्ञाना पर्यंत किंवा तंत्रज्ञान पूर्णपणे त्याच्यापर्यंत पोहोचत नाही हेही एक महत्वाचे कारण होऊ शकते किंवा आहेच.

पूर्वी शेतीसाठी दोन बैल आणि नांगर याच्या साह्याने नांगरटी केली जायची परंतु आता बरेच शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करून कमी वेळात शेती करतात तरीपण बैलाच्या साह्याने नांगरणी करण्याचे प्रमाण अद्यापही कमी नाही. तसेच शेतीच्या मशागतीसाठी पेरणीसाठी सुद्धा ट्रॅक्टर सोबत इतर अवजारे जोडून केली जाते. शेतीच्या इतर कामासाठी साठी सुद्धा त्याचा वापर बऱ्याच ठिकाणी करतात. आणि त्यामुळे काम लवकर होते आणि वेळेची बचत होते. पूर्वीच्या काळी शेताला पाणी देण्यासाठी विहिरीवर मोट बांधली जात होती आणि त्या साहाय्याने पिकाला पाणी देत असत, परंतु आता ती पद्धत जवळपास बंदच आहे त्यासाठी आता ठिबक सिंचन, तुषार जलसिंचन, यासारख्या योजना आहे किंवा मोटर मशीनच्या साह्याने केलेल्या चाऱ्या मधून पाणी दिले जाते. सध्याच्या काळात शीतगृह मधून शेतमाल साठवणूक करणे शक्य झाले आहे. परंतु अशाप्रकारे माल साठवणूक करणारे शेतकरी फारच कमी आहे. कारण परिस्थिती नुरूप ते शक्य नाही कृषी माल जास्त टिकाऊ नसल्याने जास्त दिवस साठवणूक करणे शक्य नसते, हे एक कारण तर आहेच पण आर्थिक दृष्ट्या ते सगळ्यांनाच परवडणारे नसल्याने मिळेल त्या बाजार भावात माल विकावा लागतो. तसेच माल तयार करण्याची मजुरी,खते, कीटकनाशके वाहतूक व्यवस्था यावरही होणारा खर्च भरपूर असतो आणि शेतमाल साठवून त्याला खर्चाची व्यवस्था करणे शक्य नसते.

वाढत्या पेट्रोल डिझेलचे भावा मुळे शेतीच्या मशागतीसाठी पेरणीसाठी ट्रॅक्टरचा वापर करणे परवडत नाही. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ट्रॅक्टर खरेदीवर सबसिडी मिळते परंतु उर्वरित रक्कम भरण्याची त्याची क्षमता नसते.

ठिबक सिंचन-लहान लहान नळ्या द्वारे झाडाच्या मुळाला थेंबाथेंबाने पाणी देण्याची आधुनिक सिंचन पद्धत किंवा प्रणाली म्हणजे ठिबक सिंचन. या आधुनिक सिंचन प्रणाली मुळे कमी पाण्यात पिके घेता येतात. आणि पाणी थेट मुळापर्यंत जाते .अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ठिबक योजनेसाठी 55 टक्के अनुदान मिळते तर इतर शेतकऱ्यांना साधारणपणे 45 टक्के अनुदान मिळते. आता या योजनेत शेतकऱ्यांना 80 टक्के आणि 75 टक्के अनुदान मिळणार आहे असे वाचण्यात आले.

तुषार जलसिंचन द्वारे पंप ,स्पिंकल्र्स आणि पाईप द्वारे पाणी दिले जाते ते पिकावर पावसासारखे फवारले जाते याद्वारेही कमी पाण्याचा वापर करून पिकांना पाणी पुरवठा केला जातो. या योजनेत शेतकऱ्यांना अनुदान मिळत असते. परंतु ठिबक सिंचनासाठी खर्च करण्यासाठी शेतकऱ्याला कर्ज मिळण्यासाठी वाट बघावी लागते. बँका मध्ये वारंवार चकरा माराव्या लागतात .यासाठी शेतकऱ्याला सुरुवातीलाच खर्च करावा लागतो. नाहीतर कुठून तरी व्याजाने पैसे काढावे लागतात. बऱ्याच वेळा अनुदान मिळणे कठीण होते,विलंब किंवा ती मिळण्याची हमी नसते. बऱ्याच वेळा कृषी धोरणात बदल होत असतो. सरकार बदलले, मंत्री बदलले तरी यात बदल होतो आणि त्यामुळे शेतकऱ्याच्या पाठीशी असे अनुभव असल्याने ते ठिबक सिंचन तुषार सिंचन करण्यासाठी फारसे उत्सुक नसतात. वास्तविक कृषी विभागाकडून




शेतकऱ्यांना वेळोवेळी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे मार्गदर्शन सर्व आवश्यक आहे ह्या गोष्टी नेमक्या घडत नाहीत.

पॉली हाउस हे पॉलिथिन पासून बनवलेले संरक्षणासाठी किंवा सावलीसाठी बनवलेले छाया घर आहे असे म्हणावे लागेल. या पद्धतीचा उपयोग साधारणपणे उच्च किमतीच्या कृषी उत्पादनासाठी केला जातो. त्यामुळे बसवलेल्या उपकरणांच्या मदतीने त्यातील तापमान आणि प्रकाश हे नियंत्रित केले जातात याची रचना म्हणजे स्टील पाईप पासून बनवलेले असते. शासनाकडून पाचशे ते 4000 चौरस मीटर साठी अनुदान योजना आहे. लहान शेतकरी 500 चौरस मीटर पर्यंत ही तयार करू शकतात. पॉलिहाऊसमध्ये वर्षभर उत्पादन घेतले जाऊ शकते तसेच उत्पादन सामान्य उत्पादनापेक्षा तीन ते चार पट जास्त असते.

शेडनेट गृह सावलीसाठी उभारलेले आच्छादन असते. ते लोखंडी अँगल पाईप लाकूड किंवा बांबू यापासून बनलेले असते ते निरनिराळ्या सावलीच्या गुणांका प्रमाणे जाळीने झाकलेले असते. शेडनेटच्या सहाय्याने दिवसा पिकांसाठी प्रकाशाची व उष्णतेची तीव्रता कमी करता येत असते. शेडनेट गृहात साधारणपणे ढोबळी मिरची ,टोमॅटो, काकडी, ब्रोकोली, फ्लावर ,कोबी,वांगी ,मिरची ,भेंडी आदी भाज्या घेतल्या जातात. परंतु बाजार शेत अशा भाजीपाला योग्य भाव मिळणे अवश्य नसते नाहीतर सगळा खटाटोप करून शेवटी हाती काहीच पडत नाही आजही आपण बाजारात भाजीपाल्याच्या किमती बघितल्यास खूप वाढलेले असतात परंतु प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्याच्या हातात फार कमी रक्कम पडत असते शेतकऱ्या कडून घेतला भाजीपाला चार ते पाच पटीने बाजारात विकला जातो. ही तफावत दूर होणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकरी बाजारपेठ म्हणजे शेतकऱ्यांचा माल शेतकऱ्याचा विकला तर काहीतरी साध्य होऊ शकेल. फुलाच्या शेतीच्या बाबतीतही तीच परिस्थिती आहे.

माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी त्यांच्या शेतात दुधी भोपळ्याचे पिक घेतलै.आणि त्यासाठी त्यांनी इस्रायल तंत्रज्ञानाचा वापर केला .सीडलेस जांभूळ, खजुराची लागवड केली. अनेक मोठे सधन शेतकरी, राजकीय नेते अशा तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रणाम फायदा करून घेताना दिसतात.आणि शेती पारंपारिक पद्धतीने करण्यापेक्षा तिला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास ती फायदेशीर होते मात्र शेतकऱ्यांनी त्यासाठी नवनवे प्रयोग करण्याची गरज आहे. असेच सगळेजण सांगत असतात आणि शेतकऱ्याला उपदेश करीत असतात. हे जरी खरे असले तरी ह्या गोष्टी त्यांना शक्य झाल्या म्हणून सर्वसाधारण शेतकऱ्याला ते शक्य होईल का ? त्यांना ज्या प्राधान्यक्रमाने सबसिडीची रक्कम मिळते ती सगळ्यांना मिळते का? भाव मिळतो का? हा मोठा प्रश्न आहे. आणि आज तीच गरज आहे की हे जे आधुनिक तंत्रज्ञान आहे मग ते ट्रॅक्टर असो, ठिबक सिंचन, असो तुषार जलसिंचन, असो शेडनेट असो किंवा पॉली हाउस असो किंवा शेती विद्यापीठाकडून आलेले नवीन संशोधित बियाणे असो हा सर्व फायदा सर्वसाधारण शेतकऱ्यांना मिळाला किंवा ते आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचल्यास शेतीचा सर्वांगीण विकास होईल अन्यथा काही मर्यादित क्षेत्रासाठी आणि शेतकऱ्यांसाठी त्या योजना असतील असे म्हणावे लागते.

देशातील कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास घडवून आणायचा असल्यास शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान नवनवीन संशोधित बियाणे या सर्व गोष्टी अल्प अत्यल्प कोरडवाहू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना सिंचन व्यवस्था प्रामुख्याने उपलब्ध करून दिल्यास या सर्व गोष्टींचा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्याला दिला आणि त्याच्या आर्थिक अडचणी दूर केल्यात उत्पादित मालाला योग्य भाव मिळाला तर आणि तरच शेतीव्यवसायाला चांगले दिवस बघायला मिळतील.

# शेतकरी आणि जनसामान्यांच्या व्यथांचा : अंत:स्थ हुंकार



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**अंतस्थ हुंकार हा ग्रामीण परिसरातील बदलत्या स्थितीचा धांडोळा घेणारा कवितासंग्रह. 'कैवार' त्यांच्या या पहिल्याच कवितासंग्रहाला चाळीसहून अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अर्थात पुरस्काराने त्या कवितांचे आणि संग्रहाचे मूल्यमापन होत नसले तरी जनसामान्यांना तो कितपत आवडला म्हणजे त्याला कितपत लोकाश्रय लाभला हे देखील महत्त्वाचेच असते. 'कैवार' या कवितासंग्रहाला लोकाश्रय आणि परीक्षकांश्रयदेखील लाभला. त्यांनी 'कैवार'मधून शेतकरी, शेतमजूर आणि जनमानसाच्या कविता अगदी साध्या सोप्या शब्दांत आणि छंदांतून या संग्रहातून मांडल्या आहेत. त्यांचा हा दुसरा 'अंतस्थ हुंकार' कवितासंग्रहदेखील पहिल्या कवितासंग्रहापाठोपाठ त्याच वाटेने जाणारा आहे.**

ओवी, अभंग अशा ग्रामीण परिसरातील लोकांना मुखोद्गत असणाऱ्या छंदात ते लिहितात. बहिणाबाई चौधरी यांनी अष्टाक्षरीमधून लोकांना सामान्यांच्या व्यथा विशेषतः स्त्री जीवनाच्या समस्या समजावून सांगितल्या. ग्रामीण जनतेचा ठाव घेण्याचा प्रयत्न शिवाजीराव शिंदे यांनी या संग्रहातून केला आहे. अंतस्थ हुंकारची सुरुवातच लहरी पावसाचा वेध घेण्यापासून होते.

**पाऊस धोधार ।स्थिती ही गंभीर ।**
**चोहिकडे पूर ।कोकणात ।**

असे कोकणच्या पुराचे वर्णन करतानाच इतरत्रही पावसाने मांडलेला कहर शेतकरी व ग्रामीण माणसांच्या तोंडचे पाणी पळवणारा कसा ठरतो याचा लेखाजोखा मांडतच शिवाजीरावांनी या कवितेच्या शेवटी विठ्ठलालाचा साकडे घालून वाचवण्याची विनंती केलीय. ते म्हणतात,

**विठू निसर्गाचा ।थांबव तांडव ।**
**करू दे मांडव ।पुन्हा उभा ।।**

गेल्या पावसात कोकणात आणि कोल्हापूर आदी परिसरात पावसाने गावेच्या गावे कवेत घेतली होती. कित्येकांची घरे व संसार वाहून गेला. तो पुन्हा नव्याने उभा करण्यासाठी हे विठ्ठला तू पावसाचे तांडव थांबव असे ते विनवतात.

तसेच अवकाळी येणारा पाऊस हा कुणब्याचे जिणे मातीमोल करतो. या पावसाने आभाळ फाटते व नशीब फुटल्यागत शेतकरी व जनजीवन मातीमोल होतो हे 'अवकाळी पाऊस' या कवितेतून दिसते.

कवी ग्रामीण परिसरातून शहरात आलेले आहेत. त्यांच्यावर तेथील संस्कार आणि श्रद्धामय जीवनाचा प्रभाव आहेच हे दुसऱ्या 'प्रार्थना' या कवितेतून कळते. सर्व सद्गुण अंगीकारावेत, विशेषतः माणूसपण जपून भुकेल्यांसि अन्न हे संतवचन पाळण्याचे भान असायला हवे आणि सर्वांना समान वागणूक देण्याची वृत्ती जनमानसात असू दे, असे मागणे ते परमेश्वराकडे मागतात.

'अनाथांची माय' या नावावरूनच हल्लीच दिवंगत झालेली अनाथांची माय सिंधूताई सपकाळ यांना समर्पित ही कविता आहे, असे कळतेच. कोरोना नावाच्या महाभयंकर विकार आणि आजाराने जगभर थैमान घालून कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त केली. त्यात अनेकांचे मायबाप गेले. कोरोनाला हरवून परत सुखरूप घरी येण्याचे वचन आईबाबांना कोरोनाने पाळू दिले नाहीय मग त्या पोरक्या लेकरांची जी स्थिती झाली ते 'आईबाब हिरावल्यानंतर' या कवितेतून कवीने मांडली आहे. याच विषयावरील 'कोरोना महामारी' ही कविता अशीच विदारक परिस्थितीचे दर्शन घडवून विमनस्क करणारी आहे.


महाराष्ट्रातील अवघ्या जनांनाच पंढरीच्या परब्रह्माच्या दर्शनाची सदैव ओढ असते. कोरोनामुळे देव आणि भक्तांचीही ताटातूट झाली आहे, हे 'वारी' या कवितेतून कवीने सांगितले आहे. 'भक्ती' ही कवितादेखील परमार्थ करण्यास प्रवृत्त करणारी आहे. 'गुरू' या कवितेतून गुरुंचा महिमा वर्णन केला आहे.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत नीरज चोप्रा या तरुणाने सुवर्णपदक मिळवले त्याने संपूर्ण भारताची मान अभिमानाने ताठ झाली. त्याला मानाचा मुजरा करणारी 'सुवर्णयश' ही कविता आपल्यालाही गौरवान्वित करते.

'वाटणी' ही कविता ग्रामीण भागातील संघर्षाचे चित्रण करणारी आहे. ग्रामीण भागात कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणारे शेतकरी आहेत तसेच मुलीच्या लग्नासाठी घेतलेले कर्ज न फेडता आल्याने जीवन संपवणारेदेखील आहेत. अशा हताश, निराश बापाची व्यथा कवीने 'व्यथा कन्येची' या कवितेतून प्रकट केली आहे.

'हल्ली गावाकडं जाणं जमत नाही' ही कविता शीर्षकाप्रमाणेच दीर्घ आहे. कवितेचा विषयच दीर्घ आहे. शहरात रमलेल्या पिढीला आता गावकडं करमत नाही, खेड्यातल्या मातीत मन रमत नाही. शहरीकरणाला रुळलेल्या (गावाकडून शहराकडं चार पाच वर्षांत स्थिरसावर झालेल्या) पिढीला आता गावाकडील लोकांबद्दल प्रेम, आपुलकी राहिली नाही ही वस्तुस्थिती सांगत आईबापापासून तुटल्यागत आणि त्यांच्याशी देण-घेणं उरलं नाही हे विदारक सत्य ही कविता सांगते. बालमित्रांनाही तो आताशा भेटत नाही. शहराकडे बायको - मुलांना घेऊन राहणाऱ्या पिढीचं वास्तव चित्र ही कविता उभं करते.

'बळीराजाची नशिबाने थट्टा केली!' अवकाळी पावसाने शेती आणि शेतकऱ्यांची होणारी दैना या कवितेत दिसते. 'नेत्यांचे दौरे' ही कविता शेतकऱ्यांची क्रूर विटंबना करणाऱ्या नेत्यांच्या वर्तनाकडे बोट करते. केवळ आश्वासने देऊन भुलवणारे नेते, फोटोसेशन करून आपली हौस भागवणारे नेते आपला शब्द कधी पाळतील या




आशेवर शेतकरी गुजराण करतो. हालाखीत दिवस काढतो. 'जगणं शेतकऱ्यांचं' आणि 'सांत्वनाचा भार' या कवितांतून एकीकडे निसर्ग नाडतो आणि दुसरीकडे नेते, राजकारणी व सरकार फक्त कोरडे सांत्वनच करतात. शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर होतो. असं या कविता सांगतात.

**'शेजाऱ्याचं पाहून लावतो भरमसाठ कांदा**
**भाव पडल्यानं संकटात येतो जगाचा पोशिंदा'**

ही ओळ शेतकऱ्यांच्या व्यथेवर नेमकं बोट ठेवते. 'संकटांचा ससेमिरा' ही कविता शेतऱ्यांना दलाल आणि व्यापारी किती आणि तसे लुटतात असं सांगत चहुकडून आपत्तीत सापडलेला शेतकरी 'वैतागून एक दिवस ते जीवनालाच कंटाळतात । स्वतःच्याच शेतात शेतकरी फास घेऊन मरतात' आणि 'राजकर्त्यांना पाहिजे असतं टीकेसाठी कारण। पोशिंद्याच्या आत्महत्येचं होतं घाणेरडं राजकारण' हे शेतकऱ्याच्या नशिबाचं विदीर्ण चित्रण मनाला त्रासून जातं.

'विध्वंस महापुराचा' आणि 'साकडं' या दोन परस्परविरोधी कविता आहेत. 'चहुकडे एखच हाहाःकार उडाला। अनेकांचा संसार उद्ध्वस्त झाला'. हे अतिवृष्टीचं संकट आणि पुरामुळे झालेला विध्वंस तर दुसरीकडे 'पावसा पाहू नकोरे आमचा अंत । भर पावसलाळ्यात नको घेऊ उसंत' अशी विनवणी करत 'पावसा विनवणी करून घालतो साकडं मनसोक्त कोसळं, पाहिजे तेवढं पड।' आणि मग 'दुथडी भरून वाहू दे गावाकडची नदी। पिकांचं दान पडुदे पोशिंद्याच्या पदरामदी।' असं साकडं घालून शेतकरी मागणं मागतो. 'पोशिंद्याचं स्वप्न,' 'कुणब्याची पोरं' आदी कविताही शेतकऱ्यांचं जीवन चित्रित करतात.

'सामाजिक विदारकता' ही कविता समाजातील कोवळ्या कळ्यांवर होणारे अत्याचार, त्यांच्या हत्येविषयी चीड व्यक्त करते. कुणीतरी कृष्ण पुन्हा जन्माला यावा, अशी विनवणी कवी करतो. 'माणसे,' 'राजकारण', 'आयुष्यात काय कमवावं' आदी कविता समाजातील विषमता, लोकांची दुटप्पी भूमिका यांवर कोरडे ओढते.

'वडिलांचा मुलीला संदेश' ही कविता मुलीचा जन्म ते विवाह इथपर्यंतचा प्रवास वर्णन करते. 'संस्काराचं लेणं लेऊन जात आहेस । आठवणीचं देणं देऊन जात आहेस।' अशी मुलीच्या बापाची अवस्था वर्णन करणारी ओळ ते लिहून जातात.

एकंदरीत कविता संग्रह सामाजिक जाणिवांची कविता घेऊन आलाय. समाजातील विदारक चित्र पाहून उमटलेला अंतस्थ हुंकार ही कविता प्रकट करते.

संतोष घोंगडे यांचे मुखपृष्ठ देखणे आणि कवितेला साजेसे आहे.

**पुस्तक : अंतस्थ हुंकार, कवी : शिवाजी नारायणराव शिंदे, मुखपृष्ठ : संतोष घोंगडे, पृष्ठे ११२, प्रकाशक : हर्मिस प्रकाशन, पुणे - ४११०६८**

# पशुपक्ष्यांकडून मिळणारे पावसाचे पूर्वसंकेत

आधुनिक केसरी

**बिळांमध्ये दडून राहणारे सरपटणारे जीव बिळाच्या बाहेर पडू लागले की ती हमखास पावसाची चाहूल समजावी. या प्राण्यांना पाऊस येणार असल्याचे अगोदरच कळलेले असते. त्यामुळे बिळात पाणी शिरण्यापूर्वीच स्वत:च्या बचावासाठी ते उंच जागांचा आश्रय शोधू लागतात. पावसाळ्यापूर्वी सापदेखील मोठ्या प्रमाणात बिळाच्या बाहेर पडू लागतात. मराठवाड्यात प्रचंड संख्येने आढळणाऱ्या गोडंबा - म्हणजे बिब्याच्या झाडाला बहर येणे हे दुष्काळाचे संकेत आहेत. खैर आणि शमीच्या वृक्षांना फुलोरा आल्यास त्या वर्षी पाऊस कमी पडतो. कवठाला आलेला फुलांचा बहर वादळवाऱ्याचे संकेत देतो. बिचुलचा बहर आणि कुटजाचा बहर तर अतिवृष्टीचेच हाकारे देतो.  आपण वेली पाहतो. या वेलींचे तंतू अगदी काटकोनात, सरळ रेषेत उभे राहताना दिसू लागले तर ते चांगल्या पावसाचे लक्षण समजावे.**

## 1. चातक पक्षी

पावसाळा जवळ आल्याचे संकेत आफ्रिकेतून आलेले चातक पक्षी सर्वप्रथम देतात. पाऊस अगदी वेळेवर येणार असेल तर चातक पक्ष्यांचे आगमन लवकर होते. जर त्यांचे आगमन लांबले तर पाऊसही लांबणार, ही काळ्या दगडावरची रेघ. त्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. चातक पक्षी ‘पिऊ.. पिऊ’ या त्यांच्या सांकेतिक आवाजात ओरडू लागले की पहिल्या पावसाचे दिवस जवळ आले हे हमखास समजावे.

## 2. पावशा पक्षी

चातक पक्ष्याप्रमाणेच सृष्टीतील बदलांचे पूर्वसंकेत देणाऱ्या आश्चर्यकारक घटनांचा पावशा पक्षी हा आणखी एक महत्त्वाचा दूत! ‘पेर्ते व्हा’ असे सांगणारा पावशा ओरडू लागला की जुन्या काळी शेतकरी मशागतीची कामे सुरू करत.

## 3. तित्तीर पक्षी

माळरानावर, शेतांवर काळ्या-पांढऱ्या, अंगावर ठिपके असलेल्या तित्तीर पक्ष्यांचे थवे ‘कोडयान केको.. कोडयान केको..’ अशा सांकेतिक स्वरात ओरडू लागले की आता लवकरच पाऊस येणार असे खुशाल समजावे. जंगलातील माळरानांत या पक्ष्यांचे अस्तित्व फारसे आढळून येत नाही. परंतु मानवी वस्त्यांशेजारच्या माळरानांवर तित्तीरांचा गडबडगुंडा सुरू झाला की ते हमखास पावसाचे लक्षण समजले जाते.

## 4. कावळा

कावळ्याने मे महिन्याच्या काळात बाभुळ, सावर अशा काटेरी झाडांवर घरटे केले तर पाऊस कमी पडतो आणि आंबा, करंज या वृक्षांवर केले तर त्या वर्षी पाऊस चांगला येतो, हा जंगलातला अनुभव आहे. कावळ्याने झाडाच्या पूर्व दिशेने घरटे केले तर पाऊस चांगला पडणार. पश्चिमेला केले तर पाऊस सरासरीएवढा पडणार. दक्षिण-उत्तरेला केले तर पाऊस अत्यंत कमी पडणार. आणि झाडाच्या शिखरावर केले तर अवर्षणपर्वाची ती नांदी होय. सहसा कावळा झाडाच्या शिखरावर घरटे करीत नाही. आणि केले तर ती अत्यंत दुर्मीळ घटना असते. यातून दुष्काळाचे अगदी डोळस संकेत मिळू शकतात. यापेक्षाही मनोरंजक बाब म्हणजे कावळिणीने अंडी किती घातली, यावरूनही जुन्या काळात पावसाचा अंदाज



बांधला जात असे. तिने सुमारे चार अंडी दिली तर पाऊस चांगला पडतो. दोन अंडी दिली तर कमी पाऊस. एकच अंडे दिले तर अतिशय कमी. आणि जमिनीवर अंडी दिली तर अभूतपूर्व दुष्काळाचे आगमन ठरलेले.

## 5. वादळी पक्षी

पाऊस येण्याअगोदर वादळी पक्षी किनाऱ्याच्या दिशेने येऊ लागतात. त्यामुळे पाऊस पडणार याचे संकेत ओळखून समुद्रावर उपजीविका करणारे मच्छिमार आपल्या बोटी, जहाजे, पडाव समुद्रात नेत नाहीत. अशावेळी केव्हाही पाऊस कोसळण्याची शक्यता असते. वादळी पाखरू किनाऱ्याच्या दिशेने आले की वादळवारा त्याच्यापाठोपाठ येत आहे याचे संकेत कोळ्यांना मिळतात. एक प्रकारे ती धोक्याची पूर्वसूचनाच असते. त्याचा अर्थ हमखास पाऊस पडणार किंवा सुमद्रात वादळ येणार.

## 6. मासे

पहाडी, डोंगरी भागातील माशांच्या अंडयांतील पिल्ले मोठी होऊन जेव्हा समुद्राच्या दिशेने पोहू लागतात, तेव्हा तो काळ पाऊस संपण्याचा उत्तरा नक्षत्राचा असतो. त्यामुळे पाऊस केव्हा पडणार आणि केव्हा संपणार, याची सुस्पष्ट चाहूल माशांच्या या जीवनचक्रातून मिळते.

## 7. खेकडे

तांबूस रंगाचे खेकडे हजारोंच्या संख्येने समुद्राच्या दिशेने जाताना दिसतात. तुम्ही त्यांच्या मार्गाचे निरीक्षण केले असता अशा अनेक अभूतपूर्व घटना पाहावयास मिळतात. समुद्राच्या दिशेने जाणाऱ्या खेकडयांवरून शेतकऱ्याला पावसाचे संकेत मिळतात. हा खेकडयांच्या स्थलांतरणाचा कालखंड आहे. भरधाव वाहनांखाली असे हजारो खेकडे दरवर्षी समुद्राकडील प्रवासादरम्यान चिरडले जातात. परंतु त्यांची समुद्री धाव कशासाठी असते, याचा कोणी विचारही करीत नाही.

## 8. हरीण

पाऊस येणार नसेल तर विणीच्या काळातही हरिणी पिल्लांना जन्म देत नाहीत.

## 9. वाघिण

आम्ही पाहिलेली ही वाघीण गर्भवती होती. तिला पिल्ले होणार होती. परंतु या वाघिणीने डायसकोरियाचे कंद खाऊन गर्भपात करवून घेतला. हे कंद खाऊन आदिवासी स्त्रियादेखील गर्भपात करवून घेतात. या वाघिणीचे सृष्टीज्ञान अक्षरशः तोंडात बोटे घालायला लावणारे होते. यंदा पाऊस येणार नाही, त्यामुळे जंगलात गवत राहणार नाही. गवत नाही म्हणजे तृणभक्षी प्राणीदेखील राहणार नाहीत. परिणामी आपल्या पिलांना भक्ष्य मिळणार नाही. त्यांची उपासमार होईल याची पूर्वकल्पना आल्यानेच तिने गर्भपात करवून घेतला होता. वाघिणीच्या गर्भपातानंतर त्या वर्षी अभूतपूर्व दुष्काळ पडल्याचा अनुभव आम्ही घेतला आहे.

## 10. वाळवी

जंगलात हमखास झाडे पोखरणाऱ्या वाळवी/ उधईला कधी पंख फुटत नाहीत. परंतु पावसाळ्यापूर्वी वारुळातून उधईचे थवेच्या थवे हजारोंच्या संख्येने एका झपाटयात बाहेर पडू लागले की पावसाचे लवकर आगमन होते. पावसाळ्यापूर्वी प्रजननासाठी वाळवीचे पंख फुटलेले थवे उडून एकमेकांशी समागम करतात. त्यातून त्यांच्या नंतरच्या पिढया तयार होतात. त्या जंगलात वारुळे तयार करतात.

## 11. काळ्या मुंग्या

हजारोंच्या संख्येने काळ्या मुंग्या त्यांची पांढरी अंडी तोंडात धरून सुरक्षित जागी नेऊ लागल्यास पाऊस नक्की पडणार, हे समजावे. अत्यंत पुरातन काळापासून काळ्या मुंग्यांच्या हालचालींवरून पावसाचे अंदाज बांधले जात आहेत.

# मोबाइल नाद बरा नाही !




अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र. : ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**अलिकडे मिडीयाचं सत्र सुरु आहे. यामध्ये लोकं सर्रासपणे मोबाइल फोन आणि स्मार्टफोनचा वापर करीत आहेत. त्यातच ते गुंतून जात आहेत. अशावेळी कोणता प्रसंग केव्हा जीवावर बेतेल हे सांगणे कठीण होवून बसलेले आहे. या मोबाईलमध्ये गर्क असताना त्यांना भानच नसते की आजूबाजूला काय घडत आहे. त्यांच्या स्वतःच्या मुलांवरही लक्ष नसतं पुरेसं. याबाबत एक प्रसंग सांगतो.**

एक महिला स्मार्टफोनचा वापर करीत मिडीयावर बोलत होती. त्यावेळी तिच्यासोबत लहान बाळ होता. तो खावूसाठी रडत होता. कारण बाजूला दुकान होतं. अशातच ती मोबाइलमध्ये गुंगून गेली असताना ते इवलं बाळ तिच्याजवळून निघून गेलं. परंतु तिचं त्या बाळाकडे लक्ष नव्हतं. शेवटी मोबाइल नादाचा छंद पूर्ण होताच ती भानावर आली. तिला आठवलं की आपलं बाळ आपल्यासोबत होतं. ते कुठं गेलं असेल. त्यातच ती शोधाशोध करु लागली. परंतु ते बाळ काही सापडेना. शेवटी जवळच्या पोलिस स्टेशनला तक्रार करायला गेली असता ते बाळ तिला तिथंच दिसलं.
पोलिसांनी सांगीतलं की कोण्या एका गृहस्थानं ते बाळ रडत असताना पोलिस स्टेशनला आणून दिलं. असा आहे मोबाईल नाद. या नादात लोकं आपलं घर-दार मुलं व परीवारदेखील विसरुन जातात. याबाबत दुसरा आणखी प्रसंग सांगतो.
एक महिला पती असताना याच मोबाइलवर बोलून बोलून भाळविणाऱ्या प्रियकरासोबत बोलून पळून गेली. त्यातच तिनं तिच्या दोन मुलांचाही विचार केला नाही. ते जेव्हा तिच्या वडीलानं ऐकलं, तेव्हा त्यांना जबर धक्का बसला व त्यांना ॲटॅक येवून ते मरण पावले.



मोबाइल फोन हवा तर चांगला आहे. त्यामधून चांगली चांगली माहिती मिळते. जी पाहिजे ती एका क्लिकवर. परंतु तो एवढा खराबही तेवढाच आहे की तुमचं संपूर्ण जीवन बरबाद करुन टाकत असतो.
अलिकडे मोबाईलचेच स्तोम वाढले आहे. लहान जरी पाळण्यातील मूल असेल तरी तेही मुल मोबाइलवर गाणं लावलं की शांत खेळतो, झोपतो. त्यातच अवघ्या एक दिड वर्षाचा मुलगा मोबाइलवर खेळ खेळतो. खेळ कसे उघडायचे ते त्याला कळतं. तसेच तो थोडा मोठा झाला की त्याला सांगावच लागत नाही की मोबाइल कसा वापरावा. कोणती कुलूपं आणि कशी लावावीत. मोठमोठ्या माणसांना लाजवेल असं त्यांचं कौशल्य असतं.
आज याच मोबाईलच्या नादानं प्रियकरासोबत पळून जाणाऱ्या मुली मागं वळून पाहात नाहीत. पुढचं भविष्यही पाहात नाहीत की माझ्यासोबत काय घडणार आहे ते. तिच्या गेल्यानंतर तिच्या मागे तिचे मायबाप परेशान असतात. प्रसंगी आत्महत्या करतात वा ॲटॅकनं मरण पावतात. तर ती गेल्यानंतर भविष्यात तिचा जोडीदार हा निकम्मा आणि व्यसनाधीन निघतो. तो दररोज तिला मारतो. तिच्याकडून पैसा वसूल करतो. प्रसंगी तिला कोणतीही कामं करायला पाठवतो. याबाबत सैराट चित्रपट आपल्या डोळ्यासमोर उभा आहे. परंतु त्या ठिकाणी मोबाइलमुळं झालेलं प्रेम दाखवलं नाही. परंतु मोबाइलमुळं तेही घडू शकतं हे आवर्जून सांगावेसे वाटते.
मोबाइल वापराअंतर्गत आणखी एक माहिती द्यावीशी वाटते ती म्हणजे काही लोकं रस्त्यानं मोबाइल पाहात चालत असतात. अशावेळी समोरुन कोणती वाहनं येतील आणि कोणती वाहनं आपल्याला येवून धडकतील हे सांगणे कठीण. याच नादात चैन चोरीचेही प्रकार जास्त वाढलेले आहेत.
महत्वाचं सांगायचं झाल्यास मोबाइल जरुर वापरावा. ती आपली गरजच आहे. परंतु तो केव्हा कुठे वापरावा याबाबत काळजी घेतलेली बरी. मला माहित आहे की अलिकडे जीवन अस्ताव्यस्त व धकाधकीचे झाले आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की मोबाइलमुळं आपलं स्वतःचं नुकसान व्हावं. आपलं करिअर उद्ध्वस्त व्हावं नव्हे तर आपल्या मोबाइल नादानं आपल्या परिवाराचं नुकसान व्हावं. आपली मुलंबाळं वनधारी लागावी. असं जर होत असेल तर हा मोबाइल नाद सोडलेला बरा एवढंच यातून सांगणं आहे.

# ‘ओला’त बसताय ? सावधान !

आधुनिक केसरी

काही वर्षांपासून पारंपरिक काळ्यापिवळ्या टॅक्सी बरोबरच “ओला” टॅक्सी खूप धाऊ लागल्या आहेत. फोन केला की हवी तिथे “ओला” हजर, भाड्यात ही स्टँडर्ड दर आकारणी अशा अनेक बाबींमुळे “ओला”ची सेवा चांगलीच लोकप्रिय ठरली आहे. असे असले तरी, मुंबई येथील पत्रकार देवश्री भुजबळ यांना “ओला”चा नुकताच आलेला अनुभव सर्वांनाच सावधगिरीची सूचना देणारा ठरला.
त्याचे असे झाले की, देवश्री भुजबळ या पुण्याजवळील उरुळी कांचन येथील काम आटोपून शुक्रवारी ओलाने मुंबई येथे येण्यास निघाल्या. तीन तासाच्या प्रवासानंतर गाडी लोणावळा पार करून घाटात पोहोचली आणि देवश्री यांना गाडीत प्राण्याचा असतो, तसा काहीसा आवाज ऐकू यायला लागला. गाडीत कुत्रे किंवा मांजर आहे का? अशी विचारणा त्यांनी ड्रायव्हर प्रसाद महामुनी याच्याकडे केली असता, सहज बोलावे तसा तो म्हणाला, गाडीत “टॉमी” आहे!
प्रथमतः देवश्री भुजबळ यांना काही कळलेच नाही. खोदून खोदून विचारल्यावर त्याने सांगितले की, गाडीत टॉमी नावाचा कुत्रा आहे. हे ऐकताच त्यांना धक्काच बसला. हा धक्का ओसरायच्या आधीच त्यांना दुसरा धक्का बसला. कारण तोपर्यंत दुसऱ्या कुत्र्याने आपले तोंड बाहेर काढले होते. तेव्हा कुठे त्यांच्या लक्षात आले की, गाडी चालवताना ड्रायव्हर सारखा एकीकडे रस्त्याकडे तर दुसरीकडे पायांकडे का सारखा बघत होता ते ! त्यांनी ही कुत्री सोबत का आणली? असे विचारल्यावर ड्रायव्हर म्हणाला, त्यांना घरी बघण्यासाठी कुणी नाही, म्हणून सोबत आणले.
कसाबसा एकदाचा प्रवास आटोपून घरी पोहोचताच देवश्री भुजबळ यांनी ओला कंपनीकडे ऑनलाईन तक्रार नोंदविली. या तक्रारीची लगेच दखल न घेता जवळपास २४ तासांनी ओला कंपनीचे सुरक्षा अधिकारी झिशान अख्तर यांनी फोन करून सांगितले की, त्या ड्रायव्हर सोबत प्रवास केलेल्या अन्य प्रवास्यांशी बोलून आम्ही अधिक माहिती घेऊ !
ड्रायव्हरच्या अशा बेजबाबदार वागण्यामुळे जीवघेणा अपघात घडला नाही, हे आपले नशीब असे म्हणून देवश्री भुजबळ “त्या” ड्रायव्हर वर काय कारवाई होतेय? याची वाट पहात आहेत. मात्र या प्रकारावरून सर्वसामान्य प्रवाशांनी यापुढे “ओला”त बसण्यापूर्वी गाडीत कुत्रे, मांजर किंवा अन्य तत्सम काही नाही ना? याची खात्री करून घेतलेली बरी जेणेकरून पुढील अनवस्था प्रसंग  टळू शकेल.



# सावळदबारा शिवारात बिबट्याने पाडला बकरीचा फडशा



आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात बिबट्याने एका बकरीचा फडशा पाडल्याने शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. तरी शेतकल्यास अजिंठा वनपरिक्षेत्राकडून तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे.
दि.२३/५/२२ सोमवार रोजी रात्री घडली आहे. सावळदबारा येथील शेतकरी सुभाष काशीनाथ खराटे यांची गट नंबर २५४ मध्ये खाजगी शेत सावळदबारा ते टिटवी पळसखेडा रोडवरील गावापासून हाकेच्या अंतरावर शेती आहे. त्यांनी शेतातील गोठ्यात बैलाची जोडी, म्हशी व काही बकऱ्या नेहमी प्रमाणे बांधलेल्या असता एका बकरीचा बिबट्याने रात्री फडशा पाडला. यामधे शेतकऱ्याचे १५ ते २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.
या गोठ्याच्या बाजूलाच दोन म्हशी, बैलाची जोडी बांधलेल्या होत्या. ग्रामस्थाचा आवाज ऐकू आल्याने बिबट्या पळून जाण्यास यशस्वी झाला. याच शेतकऱ्यांची १७/१/२२ रोजी शेळीचा रात्री फडशा पाडला होता. अजिंठा वनपरिक्षेत्राकडून पंचनामासुद्धा करण्यात आला परंतु अद्याप एक रुपयाही सुद्धा शेतकरी सुभाष काशीनाथ खराटे यांना भेटला नाही. तोवर दुसरी घटना घडली आहे.
या बिबट्याला त्वरित जेरबंद करण्याची मागणी लोकशाही मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे.
काशीनाथ खराटे यांचा मुलगा सुभाष खरादे सकाळी आठ वाजता शेतात म्हशीचे दूध घेण्यासाठी आल्यावर त्यांना ही घटना कळाली. त्यांनी लगेच सावळदबारा येथील वनपाल यांना घडलेल्या प्रकार सांगितला. त्यांनी लगेच आपल्या फौजफाटासह शेतात जाऊन पंचनामा केला. पंचनामा करते वेळी एस.डी. चाथे (वनपाल), एस.बी. खरडे (वनरक्षक), बी.आर.राठोड, युसूफखाँ आयुफखाँ पठाण, शेतकरी शातांराम खराटे, राजू खराटे, एकनाथ वरखड पंचनामा करताना उपस्थित होते.
सदरील शेळीवर हल्ला केल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी अशी मागणी लोकशाही मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे.



# माळीवाडगाव वि.का.से सोसायटी निवडणूक बिनविरोध

## चेअरमनपदी पंढरीनाथ सोनवणे तर व्हा.चेअरमनपदी जगन्नाथ गवळी यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** माळीवाडगाव (ता. गंगापूर) येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली होती. या सेवा संस्थेच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन निवडणुकीचा कार्यक्रम आज बिनविरोध पार पडला. चेअरमनपदासाठी पंढरीनाथ सोनवणे यांचा तर व्हाईस चेअरमनपदासाठी जगन्नाथ गवळी यांचा प्रत्येकी एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी बेडवाल यांनी त्यांची या पदावर बिनविरोध निवड जाहीर केली. याकामी त्यांना माळीवाडगाव सेवा सोसायटीचे सचिव अनिल देशमुख, गणेश साबळे यांनी सहाय्य केले.
लासुरटेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा माळीवाडगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संस्थापक शेषराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया बिनविरोधपणे पार पडली. याप्रसंगी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लासुरटेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्वर वाघचौरे, कारभारी आबा जाधव, उपसरपंच विजय तुपे, उत्तम जाधव, रामभाऊ मोरे, शिवराम सोनवणे, एकनाथ वाघचौरे, विष्णू पांडव, राजू सुरासे, पुष्पाबाई गवळी, रुक्मनबाई वाघ, यांच्यासह गणेश वाघचौरे, वैजनाथ वाघ, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र सदावर्ते, ज्ञानेश्वर गवळी, कडू जाधव, कचरू गिरी यांची उपस्थिती होती.

# मी बोलावल्यास आला का नाही म्हणून 10 वीच्या विद्यार्थ्यास गंभीर मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील सिद्धेश्वर विद्यालयात इयत्ता 10 मध्ये शिकणाऱ्या व्यंकटेश मुळे हा टेस्ट देऊन परतत असताना मी बोलावल्यास आला का नाहीस म्हणून शेख उमेर व इतर तिघांनी जबर मारहाण केल्याची घटना सोमवार दि.23 रोजी दुपारी 1 वाजण्याच्या दरम्यान घडली असून यात माजलगाव शहर पोलिसांत चौघाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
येथील सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात मराठी विषयाची टेस्ट देऊन परत निघालेल्या व्यंकटेश मुळे वय 16 यास मी बोलावल्यास तू का आला नाहीस म्हणून खांद्यावर हात टाकून आधार मल्टिस्टेट च्या बोर्डाकडे घेऊन जात इतर तीन जणांना बोलावून घेत दगड व गजाने जबर मारहाण केली. यात व्यंकटेश हा गंभीर जखमी झाला असून त्यास चार टाके पडले आहेत तर जबर मुका मार देखील लागला आहे. व्यंकटेश याच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलिसात शेख उमेर व इतर तीन जणांविरोधात कलम 324, 323, 504, 506 व 34 अन्वये गुन्हा दाखल झाला असून प्रकरणाचा तपास एपीआय लक्ष्मण केंद्रे हे करीत आहेत.
दरम्यान माजलगाव शहरात शाळा कॉलेज परिसरात गुंडागर्दी वाढली असून भांडणे, मारामाऱ्या तसेच छेडछाडीचे प्रकार देखील वाढले असल्याने पोलिसांची जरब कमी झाल्याने उपद्रव वाढत चालला आहे. त्यावर अंकुश आणून गुंडागर्दी व छेडछाड करणाऱ्यांवर पोलिसांनी अंकुश आणावा अन्यथा पालकवर्गाला कायदा हातात घ्यावा लागेल अशा संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

# सोन्नाथडी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी अनंत डक यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** तालुक्यातील संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष वेधणाऱ्या सोन्नाथडी सेवा सहकारी सोसायटीवर आ.प्रकाश सोळंके व मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांच्या नेतृत्वाखाली 5 मे रोजी बिनविरोध राष्ट्रवादीचा झेंडा फडकला आहे. यामध्ये आज दि.23 मे रोजी चेअरमन पदाची निवडणूक पार पडली. यामध्ये चेअरमनपदी अनंत डक यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.
पुढील उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यात सर्वसाधारण मतदारसंघातून अशोक डक, भगवान वगरे, आनंत डक, परमेश्वर डाके, आसाराम पवार, शिवाजी व्हरकटे, शंकर गिरी, गणेश शिंदे, इतर मागासप्रगरातुन अशोक काटकर, भटक्या विमुक्त जाती मधून सुनील कावळे, अनुसुचित जाती जमाती मतदारसंघातुन गौतम पोळ, महिला प्रतिनिधी मतदारसंघातुन कलिंदा शिंदे, गायाबाई बोरकर हे 13 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.
या नवनिर्वाचित चेअरमन व सदस्यांचे आ.प्रकाश सोळंके, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, जि.प. सदस्य चंद्रकांत शेजुळ, सभापती संभाजी शेजुळ, रमेश सोळंके, विश्वंभर थावरे, अच्युतराव लाटे, जयदत्त नरवडे आदींनी अभिनंदन केले.

# बलात्कार करणाऱ्या नराधमांना अटक करुन फाशीची शिक्षा द्यावी

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** दि.14 मे 2022 रोजी कळमसरा ता.पाचोरा जि.जळगाव येथील 13 वर्षीय अल्पवयीन दलित चर्मकार समाजातील मुलीला सात ते आठ नराधम उचलून घेउन गेले व तिच्यावर सामूहिक बलात्कार करून अत्याचार केल्याची निंदनीय घटना दि.14 मे 2022 रोजी उघडकीस आली. दि.13 मे 2022 रोजी सदर मुलगी आपल्या मैत्रिणीसोबत रात्री नऊ वाजता घरासमोर बोलत उभी होती. त्यानंतर ती गायब झाली व तिच्यावर सात ते आठ जणांनी सामूहिकरित्या बलात्कार व अत्याचार केला.
मग तिला पहाटे तीन वाजता महिलांच्या सार्वजनीक शौचालयाचे जवळ सोडून पळून गेले. तेथे सोडून दिल्यावर मुलगी आपल्या घरी आली. सदर घडलेल्या घटनेची माहिती तिने आपल्या आई-वडिलांना सांगितली. ही घटना अतिशय धक्कादायक माणुसकीला काळीमा फासणारी व दुर्दैवी आहे. पोलिसांनी काही आरोपींना अटक केली आहे. या प्रकारच्या घटना महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत हे अतिशय क्लेशदायक व निंदनीय आहे. राष्ट्रीय चर्मकार महासंघ आता गप्प बसणार नाही याची नोंद शासन व संबंधित पोलीस ठाणे यांनी घ्यावी. राष्ट्रीय चर्मकार महासंघ या घटनेचा तीव्र निषेध करीत आहेत.
सर्व आरोपींना त्वरित अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच सदर खटला फास्ट ट्रॅक कोर्टात घेऊन आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी पीडित मुलीला व तिच्या कुटुंबियांना योग्य तो न्याय मिळावा अशी मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघ बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे.
यासंबंधीचे निवेदन माजलगाव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दि. 24 रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, युवा मराठवाडा अध्यक्ष ॲड. गणेश गवळी, युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, कर्मचारी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, जिल्हा संपर्कप्रमुख रमेश जगताप, जिल्हा संघटक राधाकिसन भाळशंकर, माजी उपनगराध्यक्ष सुनील खंडागळे, तालुका अध्यक्ष सुभाष कांबळे, ज्येष्ठ नेते विष्णू गवळी, बंडू सोनवळे, सचिन वाघमारे, बजरंग खरात, बंडू सोनवणे, भागवत जाधव, मुरलीधर घोडके, गजानन वाघमारे, संतोष खंडागळे, श्रीहरी सोनवणे यांनी निवेदन दिले आहे.

# सिद्ध समाधी योगतर्फे एस.एस.वाय. शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज


**औरंगाबाद :** सिध्द समाधी योगतर्फे निवासी नऊ दिवसीय एस.एस.वाय.शिबीर आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि.1 जूनपासून ते 10 जुन 2022 पर्यंत हे शिबीर होणार आहे. तरी ज्यांच्या गावात शहरात हे शिबिर घडत नाही किंवा दुर प्रवासाचा त्रास आहे अशा पुरुष व महिला मंडळी व विद्यार्थी 10 वी 12 वी परीक्षा झालेल्या मुला मुलींना खुपच सुवर्ण योग असून या शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. नवीन सुरुवात नवी उमेद, उत्तम आरोग्य, उत्साह, आनंद, प्रेम, अंतर्बाह्य सर्वांगाचे शुद्धिकरण करणेसाठी सुवर्णसंधी असून प्रतिकारशक्ती, मनःशांती, समाधान यात वाढ करण्यासाठीची गुरुकिल्ली आहे. या शिबिरात काय शिकणार...? ऑक्सिजन लेव्हल, स्टॅमिना व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीचे शास्त्रशुध्द तंत्र - प्राणायाम, मनःशांती साठी मेडिटेशन (ध्यान), सक्षम शरीरासाठी डाएट प्लॅन व योगासने, मनाची कक्षा व्यापक करणेसाठी चर्चासत्रे, आपल्यातील हरवलेले आनंदी व खेळकर मूल शोधण्याचा सोपा मार्ग म्हणजेच एस.एस.वाय होय. कोरोनाचे सर्व नियमांचे पालन करुन शिबीराचे आयोजन केले जाईल. 9 दिवस निवास, भोजन, अमृत आहार, फलहार, सलाद कोशिंबीर वेगवेगळे ज्युस, ड्रायफ्रुटस् ची व्यवस्था करण्यात आली आहे. हे शिबिर जोडी ने आवश्य करा व पति-पत्नी जोडीसाठी विशेष सुट देण्यात आली आहे. हे शिबिर एसएसवाय आश्रम औरंगाबाद वाळुज येथे घेण्यात येणार असून आपण नाव नोंदणीसाठी 9823356223, 9421642113 या क्रमांकावर संपर्क करु शकता. मर्यादित जागा असल्याने लवकरात लवकर नाव नोंदणी करा. फोन पे किंवा गूगल पे या नंबरवर पाठवा व स्क्रीन शॉट काढून 9823356123 या नंबरवर पाठवा.

# चारु येथील साठवण तलाव दोन पूल बनवा

## मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिला उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील चारुतांडा व औरंगाबाद जिल्हयातील सोयगाव तालुक्यात चारुतांडा या साठवण तलावातील दोन पुल व चारु (मुर्ती) गावालगत दोन पुल व चारु साठवण तलावातील अर्धवट पुलाचे काम तात्काळ करा नसता उपोषण करण्याचा इशारा सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण (नादातांडा) यांनी निवेदनात दिला आहे.
शेतकऱ्यांना रस्ता नसल्याने भटकंती करावी लागते. तसेच चारु साठवण तलावातील बुडीत क्षेत्रातील विदुयत खांब व लाईन स्थालांतर करणे बाबत. सोयगाव तालुक्यातील चारु तांडा साठवण तलावात गट नं-73 नांदागांव शिवारातुन सावळदबारा शिवारात आणि सावळदबारा शिवारातून गट नं. 34 मुर्ती शिवारात असे दोन पुल करणे अत्यंत आवश्यक आहे व ते पुल न झाल्यास संबंधित शेतकऱ्यांना नांदा तांडा ते सावळदबारा या मार्गे लगबग 12 ते 14 कि.मी. लांबून पायी प्रवास करावा लागत आहे.
तसेच चारु मुर्ती या गावाला दोन्ही बाजुने पुल बांधणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पावसाळ्यात साठवण तलाव पुर्ण भरल्यानंतर नदीपात्रात पाणी वाढल्याने गावकऱ्यांना बाहेरगावी व विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेजला जाणे येणे बंद होऊन जाते व गावाचा संपर्क तुटतो व गावकऱ्यांचे महत्वाचे काम जसे की दवाखाना व शेती उपयोगी लागणारे साहित्य उपलब्ध होत नाही. पुल नसल्याने चारु मुर्ती गावातील गावकरी हे हवालदिल झालेले आहे. चारु साठवण तलावातील अर्धवट पुलाचे काम पुर्ण करणे अंत्यत आवश्यक आहे. तसेच बुडीत क्षेत्रातील विदुयत खांब व लाईन स्थालंतर करणे अत्यंत आवश्यक आहे. तसे न झाल्यास साठवण तलाव भरल्यावर जिवीतहानी होवु शकते व तसे काही घडल्यास त्याला जबाबदार कोण व काही शेतकऱ्याची जमीन संपादीत केल्यापेक्षाही जास्त बुडीत क्षेत्रात जात आहे. तरी त्या शेतकऱ्यांचा पुर्ण विचार होवुन शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग औरंगाबाद यांनी



तात्काळ न्याय मिळवून द्यावा. तात्काळ काम सुरू न झाल्यास सोयगाव पंचायत समितीचे सभापती मा.धरमसिंग चव्हाण यांनी अशा कडक इशारा लघु पाटबंधारे खात्याला दिला आहे. येणाऱ्या काळात उपोषणास बसेल व जोपर्यंत शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार नाही. तोपर्यंत मी उपोषण करत राहणार आहे, असे लेखी निवेदनात कडक इशारा दिला आहे.

# वेळेत कारवाई नाही केली तर विभागीय आयुक्त अजित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** अजित पवार आल्यापासून बीड जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरू असून ज्यांना गुरु म्हटलं जातं. ज्या गुरुजींमुळे हे लोक एवढ्या मोठ्या पदावर असतात त्या गुरुजींना विसरतातच कसे ? यामागे मग काही अर्थकारण दडलय की राजकारण. नेमकी भानगड काय? शिक्षण विभागातील इतर पदाधिकाऱ्यांसह गुरुजींच्या बाबतीतच बीडचे सी.ई.ओ. अजित पवार यांच्या कार्यकाळात शिक्षण विभागा संदर्भात हजारोंच्या संख्येने तक्रारी आहेत. अनेक तक्रारींमधे वरिष्ठांचे तर काही मधे निरनिराळ्या स्तरांवरील न्यायालयाचे सरळ सक्त आदेश आहेत की संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात यावेत. शिवाय काही प्रकरणांमध्ये तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले असतानाही बहूतांशी प्रकरणात कमालीची दप्तर दिरंगाई आणि सेवा हमी कायद्याचा भंग दिसुन आल्याने वरिष्ठांनी अनेकदा स्मरण करूनही जाणीवपूर्वक विस्मरण लक्षात आल्याने




IAS अधिकारी असणाऱ्या अजित पवार या महाशयांनी अद्यापही दोषींवरती कुठलीही कारवाई न केल्याने आणि या भ्रष्टांनी मोठा अनागोंदी कारभार चालवल्याने जर का वेळेत चौकशी करून अशा भ्रष्ट कर्मचारी-अधिकाऱ्यांवरती गुन्हे दाखल नाही केले तर मात्र आता थेट सी.ई.ओ. अजित पवार यांच्या वरतीच गुन्हा दाखल करण्याची मागणी तक्रारदार सेहगल यांनी केली आहे. यामुळे विभागीय आयुक्तांनी आता विनय वासुदेव सेहगल विरुद्ध सौ.सिमा खंडु टकले प्रकरणात त्यांच्यावरती कारवाईचा बडगा उचलला आहे.

या कारवाईमुळे बीड जिल्ह्यासह सबंध महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली असून बीड जिल्हा परिषदेचे सी.ई.ओ. अजित पवार हे काय स्वतःला उपमुख्यमंत्री अजित पवार समजतात की काय? असा प्रश्नही या निमित्ताने संबंध मराठवाडाभर चर्चिला जात आहे.

सी.ई.ओ.अजित पवार आपण काय स्वतःला उपमुख्यमंत्री अजित पवार समजताय की काय ? IAS अधिकारीच ईतके बेफिकीर वृत्तीने वागू लागले तर कनिष्ठ अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कोणाचा आदर्श घ्यायचा ?

वरिष्ठांचा आदेशाला, वेळप्रसंगी न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली जर का हे IAS अधिकारी दाखवणार असतील तर उद्या कनिष्ठ अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कोणाचा आदर्श घ्यायचा ? त्यांना कोणी धाक दाखवायचा? असे एक ना अनेक प्रश्न या अशा प्रकारांमुळे अनुत्तरीत राहतायेत. तेंव्हा आतातरी अजित पवार हे कमीत कमी बीड जिल्हा परिषदमधील शिक्षण विभागा संबंधितांच्या सर्व प्रकरणांचा निपटारा करणार का? का आल्यापासून ज्या पद्धतीने वादग्रस्त ठरत आहेत. तीच परिक्रमा पुढेही चालूच राहणार आहे. का त्यांच्यावरतीच गुन्हा दाखल होण्याची वेळ येणार ? अशी कुजबूज सबंध जिल्हाभरात होताना दिसून येत आहे. हे अजित पवार स्वतःला ते अजित पवार समजून तर असे वागत नाहीयेत ना?

**बीड जि.प.शिक्षण विभागात भ्रष्टाचाराचा कळस**

बीड जिल्हा परिषदेत ईतर विभागातील भ्रष्टाचारासह प्रामुख्याने शिक्षण विभागात वाढलेल्या भ्रष्टाचाराचा कळस उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कानावर जर का गेलातर तो सी.ई.ओ. अजित पवारांना किती महागात पडेल याचा अंदाज कदाचित त्यांना नसेल अशीही चर्चा राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, विविध कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी करताना दिसून येतायेत....! तेंव्हा आता या प्रकरणाच्या अनुषंगाने शिक्षण विभागासह संपूर्ण बीड जिल्हा परिषदेतील अनागोंदी कारभार संपुष्टात येणार का ? की परिस्थिती जैसे थेच राहणार याकडे संबंध मराठवाड्याचे लक्ष लागून आहे.



## एनएचएआय अध्यक्षा अलका उपाध्याय यांची शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी घेतली भेट

### हेडओव्हर व टनेलचे एकत्रीकरण करून नवा विकास आराखडा तयार होणार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या (एनएचएआय) अध्यक्षा अलका उपाध्याय यांची दिल्ली येथे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी भेट घेतली. औट्रम घाटातील बोगदा, शेंद्रा बिडकीन ग्रीनफिल्ड अलीगमेंट आदी मागण्यांबाबत व विकासासंदर्भात चर्चा केली.

यावेळी राष्ट्रीय महामार्ग ५२ (२११) अंतर्गत कन्नड चाळीसगाव घाटातील बोगदा (औट्रम घाट टनेल), शेंद्रा बिडकीन ग्रीनफिल्ड अलीगमेंट आदी विषयावर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी उपाध्याय यांनी हेडओव्हर आणि टनेलचे एकत्रिकरण करून नवा विकास आराखडा तयार करू असे सांगितले. तसेच आपल्या माध्यमातून सर्वोत्तोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यानी दिले.

राष्ट्रीय महामार्ग ५२ (२११) अंतर्गत औट्रम घाटातील बोगद्याला ६ हजार कोटीचा खर्च असून हा बोगदा खांन्देश, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा हा महत्वाचा दुवा ठरणार आहे. त्यामुळे या बोगद्याचे महत्व लक्षात घेता आपण या कामी व्यक्तीगत लक्ष द्यावे अशी विनंती एनएचएआय अध्यक्षा अलका उपाध्याय यांच्याकडे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केली.

गेल्या दहा वर्षापासुन राष्ट्रिय महामार्ग ५२ (२११) यामध्ये असलेल्या औट्रम घाटातील टनेलबाबत संसदेत, लोकसभेत अनेकदा प्रश्न उपस्थित करुन पाठपुरावा सुरू असल्याचे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. यावेळ पुढील आठवड्यात यासंदर्भात संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन, काम सुरू करण्याचे प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. यावेळी ॲड. आशुतोष डंख उपस्थित होते.

## अवैध वृक्षतोड करणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हे दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मनपाची परवानगी न घेता अवैधरित्या जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कांचन वानोरे तसेच डॉ. हर्षवर्धन चित्तम यांनी २२ मोठे वृक्ष तोडले आहे. तरीही संबधितांना पाठिशी घालण्याचे काम केले जात आहे. या डॉक्टरांवर दंडात्मक कारवाई करून गुन्हे दाखल करा या मागणीसाठी मनपा अतिरिक्त आयुक्तांच्या दालनाबाहेर मनसेने ठिय्या आंदोलन केले.

शहरातील महात्मा फुले पुतळा परिसरात जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या निवासस्थान परिसरामध्ये सुमारे २२ मोठे वृक्ष अनधिकृतपणे २१ फेब्रुवारी रोजी तोडण्यात आली आहे. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वानोरे यांनी महापालिका प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. वास्तविक मनपाकडून सर्व माहिती असताना देखील अद्याच चार महिन्यापासून कारवाई झालेली नाही. महानगरपालिकेतील आयुक्त, उपायुक्त तसेच संबंधित विभागाचे कर्मचारी यांनी संगनमत करून वृक्षतोड करणाऱ्या दोघेही डॉक्टरांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

वृक्षतोडीनंतर गाडी क्र. एमएच १८ एए ३४५४ मध्ये वृक्ष महापालिकेत जमा केली होती. मात्र वाहन चालकाला दंडात्मक कारवाई करून सोडून देण्यात आले आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी हर्षल परदेशी, गौरव गिते, ओम कासार, शुभम माळी, योगराज पाटील उपस्थित होते.



## शेपवाडी सेवा सहकारी सोसायटी बिनविरोध




आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** शहराच्या अगदी लगत असलेल्या व तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत आणि महत्वपूर्ण सेवा सहकारी सोसायट्यांपैकी एक असणाऱ्या मौजे शेपवाडी सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक अगदी खेळीमेळीच्या वातावरण बिनविरोध पार पडली. अलीकडच्या काळात राजकारण अगदी घराघरातील स्वयंपाक घरात पोहचल्याने ग्रामपंचायत आणि सोसायटी निवडणुकीत एकमेकांच्या अगदी जवळ असणारी मंडळी आयुष्यभरासाठी दुरावली जातात. काही कुटुंब-घराण्यांमधे तर टोकाचे हाडवैर निर्माण होऊन पिढ्यांपिढ्यांची दुश्मनी होते.

परंतु यास आमचे शेपवाडी गाव अपवाद असून आमची ग्रामपंचायत निवडणूक असो अन्य कोणत्याही निवडणूका असोत आमच्यात वाद-भांडण याला थारा नाही. तेंव्हा नाहक टोकाचे राजकारण करत वरती कायम ऐक असणाऱ्या राजकीय पुढारी-पक्षांसाठी आपण टोकाची भूमिका घेणे कितपत योग्य आहे. याविषयी आत्मपरीक्षण करुन ईतर संवेदनशील गावांनी शेपवाडीचा आदर्श घ्यावा असे मत बालासाहेब पा.शेप यांनी व्यक्त केले. आमच्या गावातील निवडणूका कुठपर्यंत वैयक्तिक घ्यायच्या हे आमचे ठरले असल्याची प्रतिक्रिया दोन वेळा उपसरपंच पद आणि सोसायटीचे चेअरमन पद घरात उपभोगलेले, अंबाजोगाई भाजपचे तालुका उपाध्यक्ष बालासाहेब पाटलोबा शेप यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.


शेपवाडी से.स.सो. बिनविरोध नवनिर्वाचित संचालक मंडळ सदाशिव विठ्ठल शेप, तुकाराम भागोजी शेप, जोतीराम बाबुराव शेप, ग्यानदेव नारायण शेप, दत्तात्रय मानाजी शेप, शिवदास माधवराव शेप, बालासाहेब बाबुराव शेप, विष्णू गणपत शेप, ओमप्रकाश नरसिंग शेप, राजुबाई पाटलोबा शेप, संजिविनी सुदाम शेप, कोंडीबा तात्या कोल्हापुरे, कैलाश पंढरी वेडे यांची निवड झाली.

ही निवडणूक ज्यांच्या भूमिकेमुळे बिनविरोध काढणे शक्य झाले ते माणिक रामराव शेप, बीड जि.प.सदस्य बालासाहेब दशरथ शेप, बंकट विश्वनाथ शेप, माणिक प्रभाकर शेप, शिवाजी रामभाऊ शेप यांचे आभार तर बिनविरोधची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष परिश्रम घेणाऱ्यांमधे त्रिदल पतसंस्थेचे चेअरमन तथा माजी सरपंच ग्यानदेव नारायण शेप, विष्णुपंत उमाजी शेप (माजी सरपंच), स्वररत्न सुभाष ज्योतीराम शेप व बाळासाहेब शेप (मा.उपसरपंच) यांच्यासह ईतरांचेही धन्यवाद-आभार व खुप-खूप कौतुक तर नवनिर्वाचित संचालक मंडळाचे मनापासून अभिनंदन करतो अशीही प्रतिक्रिया बालासाहेब पा. शेप यांनी दिली.



# महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेतर्फे विविध मागण्यांचे निवेदन फडणवीस यांना सादर

## हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनतर्फे पुष्पगुच्छ न देता पुस्तक देऊन सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता तसेच हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सरांनी औरंगाबाद विमानतळावर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करून दोन निवेदने सादर केले.

महाराष्ट्र राज्यातील 2005 नंतरच्या सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्यात यावी. छत्तीसगढ आणि राजस्थान सरकारने आत्ताच सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. अशीच आपल्या महाराष्ट्रात सुध्दा वर्ष 2005 च्या नंतरच्या सर्व शासकीय, निमशासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याची मागणीचा मुद्दा आपणही विधानसभेत मागणी मान्य होईपर्यंत लावून धरावा. शिक्षक पात्रता परीक्षा घेऊन 5 ते 6 महिने झाले परंतु आजर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी निकाल लावला नाही. तसेच आम्ही जवळपास एक महिन्यापासून पाठपुरावा करत आहोत परंतु अद्यापही आम्हाला यश प्राप्त झाले नाही. आपण हा मुद्दा उपस्थित करून लवकरात लवकर निकाल लावण्यास भाग पाडावे.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले, लवकरच दोन्ही मुद्दे घेऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री यांच्यासोबत चर्चा करून योग्य निर्णय घेण्यास भाग पाडू असे आश्वासित केले. यावेळी हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष सय्यद ताजिम व इतर उपस्थित होते.



# हिराजी महाराज सहकारी साखर कारखान्याचे भाग भांडवल परत करा : ॲड. कृष्णा जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील पिशोर येथील हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे भागधारकांना जमा केलेले भाग भांडवल परत करण्याची मागणी भाग भांडवल धारकांनी तहसीलदार संजय वारकड यांना निवेदन देऊन केली आहे.

अधिक माहिती अशी की हिराजी महाराज सहकरी साखर कारखाना उभारणीसाठी परीसरातील मोठया प्रमाणात शेतकऱ्यांनी भाग भांडवल जमा केले आहे, सदर कारखाना उभारणी न झाल्यामुळे व कारखान्याची मिळकत विक्री झाल्यामुळे या परिसरातील सर्व भागधारक शेतकरी बांधवांचा भ्रमनिरास झाला आहे.

शासनाकडे या शेतकऱ्यांचा भाग भांडवलापोटी रक्कम रुपये २ कोटी ८ लाख रुपये जमा केले होते, तसेच ७ लाख रुपये कर्मचाऱ्यांचे थकीत पगार असून ते त्वरीत देण्यात यावे, अशी मागणीचे निवेद ॲड. कृष्णा जाधव, विठ्ठल थोरात, दादाराव निकम, गणेश निकम, पोपट निकम, आजीनाथ निकम यांनी तहसीलदार संजय वारकड यांना दिले.

# शेत रस्त्यावर उतरण्यासाठी रस्ता करण्याची डॉ.मारोती मोरे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील पाहुर ते दाभा मेन रस्त्याचे डांबरीकरण व मजबुती करण्याचे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून गेल्या वर्षभरापासून चालू असून डांबरीकरण व मजबुती करणे काम जवळपास संपत आले असून आरडव दाभा पाहुर या मेन रस्त्याला अनेक शेत रस्ते व हंगामी वहिवाटी चे शेत रस्ते जोडले गेले असल्याने नवीन मजबुती करणे झालेल्या रस्त्यावर शेतकऱ्याना शेतात जाण्यासाठी कोठेच रॅप साईट उतार रस्ता संबधीत विभागाकडून आजपर्यंत करण्यात आला नाही. नुकताच पावसाळा जवळ येऊन ठेपला असून शेत मशागतीला वेग येत आहे. परंतु मुख्य रस्त्यावर चढ उतार करण्यासाठी शेतात जातात कमालीचा त्रास सहन करावा लागत. शेतकऱ्याचा त्रास कमी करण्यासाठी मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या शेत रस्त्यावर सिमेंट पाईप टाकून रस्ता चढ उताराचा सोईस्कर रस्ता करण्यात यावा, अशी मागणी दाभा येथील कृ.उ.बाजार समितीचे माजी सभापती डॉ. मारोती मोरे यांनी केली आहे. याच मुख्य पुलाचे व रस्त्याचे उर्वरित राहिलेला काम पावसाळा सुरू होण्यापूर्वी करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.



# नीट परीक्षेत यश मिळविलेल्या अक्षता झेंडे यांचा दीपगंगा भागीरथी संस्थेकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** वैद्यकीय प्रवेशासाठी देशभरात एकाच वेळी घेतल्या जाणाऱ्या NEET या परीक्षेत 720 पैकी 405 गुण मिळवून मागासवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या अक्षता झेंडे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे पहिल्या फेरीतच प्रवेश मिळविला.

सात वर्षांपूर्वी आईच छत्र हरवलेल्या, खाजगी कंपनीत फिटरची नोकरी करणाऱ्या वडिलांच्या कष्टाला आणि स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी अक्षता झेंडे यांनी महात्मा जोतिबा फुले, सावित्रीमाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाई यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत, घरकामात हातभार लावत, आपल्या स्वप्नांना, ध्येयाला साध्य करण्यासाठी जिद्दीने आणि कष्टाने अहोरात्र अभ्यास केला. त्याच अभ्यासाच्या जोरावर त्यांनी दैदिप्यमान यश संपादन करत, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे प्रवेश मिळविला.

दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, (रजि.) महाराष्ट्र राज्य या नोंदणीकृत राष्ट्रीय संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा साहित्यिक, समाजसेवक मा. हिंदरत्न दिपक लोंढे यांना ही माहिती कळताच. अक्षता झेंडे यांचे घरी जाऊन त्यांनी स्वतः अक्षताचा सत्कार केला. पुढील वाटचालीस शुभेच्छा देत, त्यांच्या पुढील वैद्यकीय शैक्षणिक काळात मदत करण्याचे आश्वासन दिले.

भावी डॉ. अक्षता झेंडे यांच्या सत्कारप्रसंगी साहित्यिक, समाजसेवक दिपक लोंढे यांचे समवेत समाजसेविका शारदा लोंढे, संस्थेचे खजिनदार शिवाजी थोरात, सदस्या धनश्री कांबळे, विद्याधर कांबळे, विकास कांबळे उपस्थित होते. अक्षताचे वडील सुरेंद्र झेंडे आणि परिवार यांनी मान्यवरांचे स्वागत करत, संस्थेचे अभार मानले.



# अक्षर मानव साहित्य विभाग आयोजित लेखन कार्यशाळेचे यशस्वीरित्या आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बदलापूर :** 22 मे रोजी बदलापूर साहित्य गौरव ग्रंथालय या प्रशस्त ग्रंथालयाच्या सभागृहात अक्षर मानव साहित्य लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. साहित्य विभाग प्रमुख संजीवनी राजगुरू, आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत डांगे, ठाणे जिल्हाप्रमुख क्षितिज देसाई व मुंबई जिल्हा प्रमुख विजय यादव यांच्या उत्तम आयोजनाने ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. पहिल्या दिवशी या कार्यशाळेचे उद्‌घाटन अक्षर मानव महाराष्ट्र अध्यक्षा प्रणोती ताई पाटील, प्रशासन विभाग प्रमुख सचिन पवळे, शिला इंदापुरकर, अभी मंगल तसेच साहित्य गौरव ग्रंथालयाचे सर्वेसर्वा श्याम जोशी यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योग विभाग प्रमुख दिपेश मोहिते यांनी केले. सुरुवातीला कार्यक्रमाची त्यांनी रूपरेषा स्पष्ट करून शिक्षण विभाग प्रमुख नीलिमा पगारे यांनी अक्षर मानव भूमिका आणि वक्ते प्रसिद्ध कवी, लेखक किरण येले यांचे स्वागत केले. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती या ग्रंथालयाचे आधारस्तंभ कॅप्टन आशिष दामले यांची होती. त्यांनी उपस्थितांचे स्वागत आणि अभिनंदन केले.

प्रथम सत्रात साहित्यिक किरण येले यांनी मराठी भाषेचा उगम, भाषा म्हणजे काय, त्यासाठी अनेक लेखक, पुस्तकांचा संदर्भ देत, लेखकातला माणूस कसा समृध्द करावा याचे धडे दिले. लेखन, लेखक या प्रवासाला साजेसे मार्गदर्शन करत शिबिरात आलेल्यांना विचार करायला लावले. त्यानंतरच्या पुढील सत्रात आपलं महानगरचे पत्रकार संजय सोनवणे यांनी लेखन, पत्रकारिता आणि जगणं याचा लेखक म्हणून कसा संबंध आहे, हे स्पष्ट केले. शब्द, भाषा ही कशी आणि कुठे वापरावी यांचे उत्तम तंत्र त्यांनी उलगडले. संजय सोनवणे यांची ओळख आणि माहिती लेखक व रंगकर्मी सुधीर चित्ते यांनी करून दिली. पुढील सत्रात सुधीर चित्ते यांनी लेखन आणि मानवी जीवन शैली यांचा संबंध आपल्या खुमासदार शैलीत स्पष्ट केला. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह प्रत्येक सहभागी शिबिरार्थींना बोलते केले. त्यानंतर शेवटच्या सत्रात मुंबई दूरदर्शन निवेदक प्रवीण जी दामले यांनी संवाद, अभिवाचन आणि लेखक यांचा संबंध कसा असतो, याचं उत्तम विश्लेषण केलं. अनेक उदाहरणं, दाखले देत संवादाची शैली समृध्द होण्यासाठी अनेक टिप्स दिल्या. यांच्या शिकवण्याच्या शैलीने प्रत्येकजण भारावून गेला. त्यांचा सत्कार आयोजिका साहित्य विभाग प्रमुख संजीवनी राजगुरू यांनी केला. त्यानंतर पहिल्या दिवसाचा समारोप करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी सूत्रसंचालन ज्योती भारती व क्षितिज देसाई यांनी केले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात चित्रपट क्षेत्रातील नावाजलेले, अभिनेते, लेखक अभिजित झुंजारराव यांनी लेखक म्हणून अनेक पैलू सगळ्यांसमोर मांडले. चित्रपट ते लेखक हा प्रवास आणि त्यातून माणूस म्हणून समृध्द होण्याची कला कशी अवगत करावी,अशी मांडणी त्यांनी सगळ्यांसमोर मांडली. त्यांचा सन्मान करण्यात आला. दुसऱ्या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक अक्षर मानव संस्थापक राजन खान सर उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात त्यांनी लेखकाचा मेंदू, लेखक आणि त्यातला माणूस याचा संबंध आणि त्यामागची पार्श्वभूमी स्पष्ट करत. लेखकाने जात, लिंग, प्रदेश, धर्म या भेदात न पडता. निव्वळ निख्खळ लिहावं, जे शुद्ध आणि स्पष्ट असावं. लेखकाने फक्त लिहावं ते समाज घडवण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी असा संदेश त्यांनी दिला. त्यानंतरच्या सत्रात लेखक विजय यादव, क्षितिज देसाई यांनी सर्वांशी संवाद सधला. चरित्र लेखन ते कादंबरी लेखन असा विविधांगी प्रवास प्रत्यक्ष लिहायला देऊन उलगडला. कवयित्री छाया कोरेगावकर यांनी छान कविता सादरीकरण केले. शेवटी कार्यक्रमाच्या समारोपाला सर्वांनी लिहीत राहायला हवं, कारण लिहिणाऱ्या माणसाचा मेंदू कधीच मरत नाही आणि म्हणून असे समाजात जिवंत राहण्यासाठी लिहीत रहा हा संदेश देत लेखक राजन खान सरांनी कार्यक्रमाची सांगता केली. उपस्थितांनी ग्रंथ सखा सर्वेसर्वा श्याम जोशी आणि राजन खान यांचा विशेष सन्मान केला आणि आभार मानले. या दोन्ही दिवशी उपस्थित असलेल्या सर्व मार्गदर्शकांचे साहित्य गौरव ग्रंथालयाच्या ग्रंथपाल अर्चना कर्णिक MAM यांचे कडून विशेष भेट देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी जागा, जेवण आणि इतर उत्तम सोय करून दिल्याबद्दल अक्षर मानव कडून साहित्य गौरव टीमचे आणि कॅप्टन आशिष दामले यांचे विशेष आभार मानण्यात आले. शिबिरार्थींनी आपल्या अभिप्रायात सांगितले की, या कार्यशाळेतून आम्हाला अनेक बारकावे समजले व येथून आम्ही खूप काही शिकलो. पुन्हा पुन्हा अशा कार्यशाळा घ्याव्यात त्यामुळे आमचे लेखन चांगले होईल. शिबिरार्थींच्या उस्फूर्त प्रतिसादाने कार्यशाळा यशस्वी झाली याचे समाधान काही औरच आहे असे आयोजकांनी आनंदाने सांगितले. लवकरच अशा कार्यशाळेचे पुन्हा आयोजन करण्यात येईल, असे आश्वासन देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY

MAHAVIR
GHAR SANSAR
• Wholesale & Retail
• Kirana, Dry Fruits, Spices
• Crockery, Home Appliances
• Home Cleaning Material, Steel & Aluminium
• Plastic Items & Many More
Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad

# नागपुरात रंगली पशु वेशभूषा स्पर्धा

## पशुसंवर्धन दिनानिमित्त आगळावेगळा उपक्रम, आकर्षक वेशभूषा केलेल्या श्वानांचे 'कॅटवॉक'

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पशुसंवर्धन विभागाच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय येथे पशु वेशभूषा स्पर्धा या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आकर्षक वेशभूषा केलेल्या श्वानांनी संगीताच्या तालावर 'कॅटवॉक' केले. 67 श्वानांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.
पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. युवराज केने, डॉ. संजय धोटे, पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रियवंदा सिरास, डॉ. पल्लवी गावंडे, डॉ. कविता साखरे, डॉ. विद्याधर धनबहादूर यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी मोफत श्वानदंश रोग प्रतिबंधक लसीकरण शिबिरात 60 श्वानांना लसीकरण करण्यात आले.
शेळी, श्वान व मांजर या तीन गटात ही स्पर्धा झाली. विविध रंगीबेरंगी वेशभूषा केलेल्या श्वानांनी रॅम्पवर



चालताना उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. वेशभूषा केलेल्या प्राण्यांसोबत सेल्फी घेण्यासाठी स्पर्धेच्या ठिकाणी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता. पशुप्रेमींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. डॉ. प्रज्ञेय ताकसांडे आणि डॉ. चित्रा राऊत यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पहिले. महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेचे निबंधक तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. बलदेव रामटेके यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.
श्वान गटामध्ये प्रकाश मायकल यांच्या 'गट्टू' या श्वानाने प्रथम क्रमांक पटकाविला. गौरव नेवारे यांच्या 'ॲरॉन' या श्वानाने द्वितीय, सिद्धार्थ चवरे यांच्या 'लोकी' ने तृतीय क्रमांक, तसेच गार्गी जोशी यांच्या 'रँचो' या श्वानाने प्रोत्साहनपर बक्षीस मिळविले.
मांजर गटामध्ये ॲड. एम. आर. खान यांची 'स्नोबेल' प्रथम क्रमांकाची विजेती ठरली. अब्दुल रज्जाक यांची 'बॉब' आणि पीयूष खातरकर यांची 'मन्नु' या मांजर अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. शेळी गटात इजाज भाई यांच्या 'सुल्तान'ने प्रथम क्रमांक, श्रीमती हसीना बानो यांच्या 'कुरबान' ने द्वितीय आणि नरेंद्र यांच्या 'बोबो' हिने तृतीय क्रमांक पटकाविला.






महानगरपालिकेतर्फे मान्सुनपुर्व नाले साफसफाईचे काम चालू असून पूर्व विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती औरंगाबाद महानगरपालिका रेणुकादास (राजु) भाऊ वैद्य यांनी विद्यानगर व मेहेरनगर भागात पाहणी करून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सुचना दिल्या. यावेळी महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता बी.डी.फड, उप अभियंता वाघमारे, अभियंता काद्री, संजय गंडे, दुर्गादास देशपांडे, शाखाप्रमुख राम केकान, राज (नाना) निळ, संदीप अहिरे, प्रकाश धुर्वे, पियुष कोयाळकर, बंटी कचकुरे तसेच वार्डातील नागरिक उपस्थित होते.

# 'होल्डिंग हँड्स'ची रत्नागिरी येथे शाखा स्थापन

### रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी गौरी मुसाडकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुद्देशीय संस्था ही विविध सामाजिक विषयावर काम करणारी संस्था असून महाराष्ट्रसह महाराष्ट्राच्या बाहेर पंजाब, गोवा व कर्नाटक येथे या संस्थेच्या शाखा स्थापन झालेल्या आहेत. काल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व गौरी मुसाडकर यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी येथे शाखा स्थापन करण्यात आली.
यावेळी गौरी मुसाडकर यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. लवकरच जास्तीत जास्ती सदस्यांना जोडण्याचे आणि लवकरात लवकर उपक्रम सुरू करू असे नवनिर्वाचित अध्यक्ष गौरी मुसाडकर यांनी सांगितले. गौरी मुसाडकर या गृहणी



असून त्यांना समाजकार्याची आवड आहे. त्यांनी कोकणच्या पुरात प्रचंड काम केलेलं आहे. बैठकीत गौरी मुसाडकर, मेघा जाधव, गीता तांबे, दिपाली देवलखकर इत्यादींची उपस्थिती होती.
औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही सामाजिक संस्था असून अल्पावधीतच या संस्थेला महाराष्ट्रासह इतर राज्यात ही यश मिळालं आहे. माणसं जोडणं, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम ही संस्था राबवित असते. या संस्थेचा महिला लघु उद्योग आणि रोजगार या उपक्रमाला प्रचंड यश मिळालं आहे.



# कला हे कालातीत, ईश्वराचे देणे असते : राज्यपाल कोश्यारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काव्य, कला, शिल्पकला, चित्रकला या सर्व कला कालातीत गोष्टी असतात. देशात परचक्र आले असताना देखील आपल्या देशातील कला टिकून राहिल्या. ईश्वरी देणे असलेल्या कलेला कधी अंत नसतो. त्यामुळे ज्याला जी कला प्राप्त झाली आहे, तिचा त्या व्यक्तीने सर्वोत्तम विकास केला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज येथे केले. राज्यपाल कोश्यारी यांनी सोमवारी (दि. २३) बॉम्बे आर्ट सोसायटी मुंबई येथे 'कला गुलदस्ता' या निवडक कलाकारांच्या कलाकृतीच्याप्रदर्शनाचे उदघाटन केले, त्यावेळी ते बोलत होते.
कला उद्योजिका व व्हिडीओशॉट्स आर्टस् अँड एंटरटेनमेंटच्या संस्थापिका अंजली कौर अरोरा यांच्या पुढाकाराने या एक आठवड्याच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पूर्वी कलेला राजाश्रय होता. आज कलेला लोकाश्रय आहे. आपल्या घरी भिंतीवर एखादी सुंदर कलाकृती असावी असे सामान्य माणसाला देखील वाटत असते, असे राज्यपालांनी सांगितले. कलाकारांनी स्वतः आशावादी असावे व लोकांना देखील जगण्याची नवी उमेद द्यावी असे राज्यपालांनी सांगितले.

**...तर कलाकार पुनश्च अजंता - वेरूळ साकारतील : भगवान रामपुरे**

यावेळी बोलताना ज्येष्ठ शिल्पकार भगवान रामपुरे यांनी पूर्वीप्रमाणे कलेला राजाश्रय मिळत नाही याबद्दल खंत व्यक्त केली. आजही कलाकारांना त्यांच्या उमेदीच्या काळात राजाश्रय मिळाला तर ते एखाद्या पहाडातून अजंता-वेरूळ सारखी अजरामर शिल्पे साकारतीलअसा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशात उत्तमोत्तम कलाकार आजहीआहेत. परंतु त्यांचेकडून काम करून घेणारे नाहीत, असे त्यांनी सांगितले.
यावेळी राज्यपालांनी प्रदर्शनाची पाहणी केली व कलाकारांशी संवाद साधला. राज्यपालांच्या हस्ते यावेळी प्रदर्शनात सहभागी होत असलेले कलाकार वैशाली राजापूरकर, अभय विजय मसराम, राखी शहा व सकीना मंदसौरवाला यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ कलाकार सदाशिव कुलकर्णी, सहआयोजक नरेंद्र सिंग अरोरा, कलाकार व कलारसिक यावेळी उपस्थित होते.



# राष्ट्रीय योग ओलंपियाड स्पर्धेसाठी मृणाल सनंसेची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली येथे 18 जून ते 20 जून 2022 या कालावधीत होणाऱ्या एनसीईआरटी राष्ट्रीय योग ओलंपियाड स्पर्धेसाठी जवाहर नवोदय विद्यालयची विद्यार्थिनी मृणाल प्रदीप सनंसे हिची निवड झाली असून राष्ट्रीय स्तरावर जवाहर नवोदय विद्यालय कन्नडच्या वतीने महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दीव दमण या राज्यांचे प्रतिनिधित्व ती करणार आहे.
या निवडीबद्दल जवाहर नवोदय विद्यालय येथे दि.19 रोजी वार्षिक महोत्सवात जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या हस्ते मृणाल सनंसे हिचा गौरव करण्यात आला. यावेळी तहसीलदार संजय वारकड, मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे, पोलीस निरीक्षक राजीव तळेकर, प्राचार्य पंकज देशमुख यांची उपस्थिती होती. यशस्वी विद्यार्थिनीस क्रीडा शिक्षिका भारती महाजन, विप्लव चव्हाण, जीवन कुटे, कुणाल कुमार यांचे मार्गदर्शन लाभले. तिची निवड झाल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in